# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १४ जुलै, २०१५ / आषाढ २३, १९३७ ( शके )**

**(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**
**(३) जलसंपदा मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**
**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८३**

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील मार्डा बॅरेज प्रकल्पाबाबत

**(१) * ७८७२ श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील मार्डा बॅरेज प्रकल्पाला खनिकर्म मंडळाची परवानगी न घेता विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने प्रकल्पाला मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाला खनिकर्म मंडळाची परवानगी न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही,

मार्डा बॅरेज करिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी दि. ०८.०७.२०१० रोजी "नाहरकत प्रमाणपत्र" दिलेले आहे. तद्नंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नागपूर यांना मार्डा बॅरेज बांधण्यास हरकत नसल्याचे विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यांनी कळविले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नातेपुते (ता.जि. सोलापूर) येथे संत ज्ञानेश्वर माऊली महाराज पालखी सोहळयाकरिता नवीन पालखी तळ उभारण्याच्या मागणीबाबत**

**(२) * ७००९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नातेपुते (ता. जि. सोलापूर) येथील संत ज्ञानेश्वर माऊली महाराज पालखी सोहळ्याचा मुक्काम इतरत्र हलवू देणार नसल्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला असल्याचे दिनांक ८ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत ज्ञानेश्वर माऊली महाराज पालखी सोहळयातील भाविकांची गर्दी वाढल्यामुळे सध्याची पालखी तळाची जागा अपुरी पडू लागली असुन याकरिता नवीन पालखी तळ उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नातेपुते येथे नवीन पालखी तळ तातडीने उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय.

(३) श्रीक्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर-भंडारा डोंगर-नेवासा तीर्थक्षेत्र विकास आराखडयास दि. १२.०९.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत आराखडयात मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअंतर्गत मौजे नातेपुते येथील पालखीतळाचा समावेश आहे. सदर तिर्थक्षेत्र विकास आराखडयाचे सनियंत्रण व अंमलबजावणी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या मार्फत करण्यात येते, विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये आराखड्यातील कामांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळयाचे विश्वस्त यांनी मौजे नातेपुते येथील पालखी सोहळयासाठी पसंत केलेली जागा ही खाजगी स्वरुपाची असून जागा मालक जागा देण्यास तयार नसल्यामुळे अद्याप भूसंपादन करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्याची नियमबाहय केलेली खरेदी**

**(३) * ६६५८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती स्मिता वाघ, श्री.अनिल सोले, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्यांना पुरविण्यात येणारे शिक्षण उपयोगी साहित्य, पौष्टीक आहार व इतर साहित्याच्या खरेदीसाठी महिला व बालविकास विभागामार्फत दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासन आदेश निर्गमित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच दिवशी २०६ कोटी रुपयांची कोणत्याही प्रकारची ई-निविदा न काढता नियमबाहयरित्या खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच महिला व बालविकास विभागाने (एकदा निविदा सादर झाल्यानंतर त्यात बदल करण्याचा कोणताही अधिकार नसताना) मेडिकल किट खरेदीच्या निविदेत अनेक बदल करुन ३ कोटी ६९ लाख ७ हजार २० रुपयांची मेडिकल किट खरेदी केल्याचे दिनांक २९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या नियमबाह्य आणि पुरवठादारास फायदा व्हावा या हेतूने खरेदी केलेल्या व्यवहाराची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांकडे दिनांक २० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध अधिकृत यंत्रणामार्फत विहित केलेल्या दरकरारानुसार तसेच आवश्यक तेथे ई-निविदेद्वारे दर निश्चिती करुन अंगणवाड्यांसाठी साहित्याची खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यता नियमानुसार देण्यात आली आहे. दरकरार उपलब्ध असतांना ई-निविदा राबविणे बंधनकारक नाही.

(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून मेडिसीन किटसाठी ठरवून दिलेली खर्च मर्यादा रु.६००/- व रु.३००/- विचारात घेऊन या किंमतीमध्ये खरेदी करता येऊ शकणाऱ्या औषधींचा समावेश करुन व परिमाण कमी करुन किट A व B खरेदी करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या आर्थिक निकषाच्या मर्यादेतच मेडिसीन किट खरेदी करण्यात आलेली आहे. निविदेत याबाबींचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे.

(४) मा.विरोधी पक्ष नेता विधानपरिषद यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २० मे, २०१५ च्या निवेदनाद्वारे खरेदीबाबत चौकशीची मागणी केली आहे.

(५) व (६) सदर निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्दांबाबत विभागाने सादर केलेल्या अभिप्रायांबाबत पुढील निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(४) * ६६९५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषदेमध्ये संगणक खरेदीमध्ये ६८ लाख रुपयाचा झालेला गैरव्यवहार, अनेक कामात बेकायदेशीर दिलेली प्रशासकीय मान्यता व अन्य गैरकारभार केल्याबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजीव जवळेकर यांना निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हा परिषदेच्या गैरकारभाराची विभागीय अप्पर आयुक्त, औरंगाबाद यांच्या पथकाने चौकशी करुन सुमारे १५ अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी सुरु झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या व्यतिरिक्त अन्य किती अधिकाऱ्यांचे निलंबन केले आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह एकूण १४ अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित आहे.

(३) राजीव जवळेकर यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचे निलंबन करण्यात आलेले नाही.

----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरील भरणे येथे जगबुडी नदीवरील बंधाऱ्याच्या पुनर्बांधणीला तातडीने सुरुवात करण्याबाबत

**(५) * ७७४७ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.रामराव वडकुते, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील भरणे येथील जगबुडी नदीवरील बंधाऱ्याच्या पुनर्बांधणीला माहे एप्रिल, २०१५ मध्ये निधी मंजूर करण्यात येवूनही बांधकामाला सुरुवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर बंधाऱ्याच्या पुनर्बांधणीचे काम तातडीने करुन सदर परिसरातील नागरिकांची पाण्याची समस्या सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) (२) व (३) भरणे बंधाऱ्याच्या पुनर्बांधणीच्या रु. १७५.६९ लक्षच्या अंदाजपत्रकास शासनाने दि. १७/१२/२०१३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सन २०१५-१६ .या आर्थिक वर्षासाठी रु. ०.६० कोटी इतका निधी मंजूर आहे. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रत्यक्ष काम सुरु करण्याची कार्यवाही क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आल्लापली ग्रामपंचायतीला (जिल्हा गडचिरोली) पर्यावरण संतुलित ग्राम समृद्धी योजने अंतर्गत प्राप्त निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(६) * ७४१४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील आल्लापली ग्रामपंचायतीला पर्यावरण संतुलित ग्राम समृद्धी योजने अंतर्गत सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात मोठ्या ग्राम पंचायतींना विशेष सहाय्य योजनेत ५० लक्ष रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्य देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीची १० टक्के रक्कम ग्रामपंचायतीचा सहभाग सोडून ४५ लक्ष येणे गरजेचे असतांना फक्त ३० लक्ष रुपये ग्रामपंचायतीला प्राप्त होवून सन २०१५-२०१६ वर्षे होऊनही अद्याप १५ लक्ष रुपये येणे बाकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामपंचायतीला उर्वरीत निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

तथापि सन २०११-१२ या वर्षात प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) होय.

उर्वरित निधी रु. १३,७०,४४१/- येणे बाकी आहे.

(३) व (४) उर्वरित निधी प्राप्त करुन घेण्याबाबत जिल्हा नियोजन समितीकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

----------------

**श्रीक्षेत्र भिमाशंकर तिर्थस्थळाचा विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(७) * ७९४१ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील श्रीक्षेत्र भिमाशंकर हे १२ ज्योतिर्लिंगापैकी सहावे असून याठिकाणी दर्शनासाठी येणा-या भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी भिमाशंकर विकास आराखडा तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने या परिसरातील १३० चौरस किलोमीटर परिसर अभयारण्य म्हणून घोषित केल्याने रस्ते वाहतूक व्यवस्था, विद्युतपुरवठा, यात्रेकरु निवास, आरोग्य केंद्र, पोलीस चौकी व पिण्याच्या पाण्याच्या सोई इ.मुलभूत सुविधांची विकास कामे वन विभागाच्या जाचक अटीमुळे करता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास आराखड्यानुसार कामे करण्यात येणा-या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नियोजन विभागाच्या शासन निर्णय दि. २३.११.२०१२ अन्वये श्रीक्षेत्र भिमाशंकर तीर्थक्षेत्र जि.पुणे याठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याच्या रु. ४.०४ कोटीच्या विकास आराखडयास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामध्ये एकूण तीन कामांचा समावेश आहे.

अ) भिमाशंकर येथे भक्त निवासस्थानासाठी फर्निचर करणे

आ) भिमाशंकर बसस्थानक ते मुख्य मंदिरापर्यंत रस्ता करणे

इ) भिमाशंकर येथील बसस्थानक सुधारणा करणे.

उपरोक्त कामापैकी भिमाशंकर बसस्थानक ते मुख्य मंदिरापर्यंत रस्ता करणे या कामाच्या एकूण ६३० मीटर मंजूर लांबीपैकी केवळ ९० मी. लांबीचे काम पुर्ण करण्यात आले असून उर्वरीत लांबीच्या कामासाठी ०.८५ हेक्टर वनजमीन संपादित करावी लागणार आहे. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. १२.१२.१९९६ च्या निदेशाप्रमाणे सदरचे क्षेत्र अभयारण्य घोषित आहे. त्याठिकाणी विकास कामे करताना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार रस्त्याच्या उर्वरीत लांबीच्या कामासाठी ०.८५ हेक्टर वनजमीन मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि. २८.०५.२०१३ रोजी केंद्र शासनाच्या वन्यजीव विभागाकडे पाठविला आहे.

-----------------

## राज्यातील समाजसेवी (एनजीओ) संस्थांनी बालसुधारगृहांत बोगस बालके दाखवून अनुदान हडप केल्याबाबत

**(८) * ६८८६ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाने बालसुधारगृहातील सर्व बालकांना आधारकार्ड सक्तीचे केल्यानंतर, समाजसेवी (एनजीओ) संस्थांची फसवणूक उजेडात येऊन गतवर्षी एनजीओकडून ७२ हजार मुले असल्याचे कळविले होते मात्र प्रत्यक्षात ३९ हजार मुलांचीच आधार कार्ड तयार झाल्याने ४० ते ५० टक्के बालसुधारगृहांत बोगस बालके दाखवून अनुदानापोटी राज्य सरकारकडून कोट्यावधी रुपये घेतल्याचे माहे एप्रिल-२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने एनजीओ कडील १०५७ बालसुधारगृहांचे अनुदान बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वरील प्रकरणास अटकाव करण्यासाठी राज्याच्या महिला व बालविकास विभागाकडून सुधारगृहातील मुलांची नोंदणी बायोमेट्रिक पध्दतीने करण्यास सुरुवात करुन १८०७ पैकी ८६९ सुधारगृहात ही यंत्रणा बसविल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

(३) शासन व स्वयंसेवी संस्था (अनुदानित) एकूण ११०५ असून राज्यातील बालकांच्या ९६९ संस्थांमध्ये बायोमेट्रिक संयंत्र बसविण्याबाबत मान्यता दिलेली असून, आतापर्यंत ८६९ संस्थामध्ये बायोमेट्रिक संयंत्र बसविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी नेमलेल्या केळकर समितीच्या अहवालाबाबत

**(९) * ७०३६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४२०७ ला दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक असमतोल दूर व्हावा यासाठी राज्य शासनास शिफारशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या केळकर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर शासनाने माहे मे, २०१५ अखेरपर्यंत कार्यवाही अहवाल तयार केला आहे काय,

(२) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे,

(३) असल्यास, सदर अहवालावर कृती अहवाल तयार करण्यासाठी शासनाने मा. वित्त व नियोजन मंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती स्थापन केली असल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मंत्रीमंडळ उपसमितीचे सदस्य कोण आहेत व समितीने आपला कृती अहवाल शासनास सादर केला आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) डॉ.केळकर यांचय अध्यक्षतेखालील समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीच्या अहवालातील शिफारशींवर सर्व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. तसेच, सर्व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय विचारात घेऊन अहवालातील शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात अहवाल मंत्रिमंडळास सादर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१५ अन्वये मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उप समिती गठित करण्यात आलेली आहे. तद्नंतर या उप समिती मध्ये दिनांक १० एिप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ०५ सदस्यांचा समावेश करण्यात आला.

सर्व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारण्यासंदर्भात उपसमितीने आपला अहवाल मंत्रिमंडळास सादर करावयाचा आहे.

(४) मा.मंत्री (जलसंपदा), मा.मंत्री (ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा), मा.मंत्री (शालेय शिक्षण), मा.मंत्री (उद्योग), मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण), मा.मंत्री (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण), मा.मंत्री (आदिवासी विकास), मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) हे सदस्य तर मा.मंत्री (परिवहन) व मा.राज्यमंत्री (वित्त व नियोजन) हे विशेष निमंत्रित सदस्य आहेत. अपर मुख्य सचिव (वित्त) हे या उप समितीचे सदस्य सचिव आहेत.

सर्व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारण्यासंदर्भात उपसमितीने आपला अहवाल मंत्रिमंडळास सादर करावयाचा आहे.

-----------------

## येवला (जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(१०) * ८०४३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण रुग्णालय येवला (जि.नाशिक) येथील ३० खाटांच्या रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यासाठी करावयाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयाने दिनांक २६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतीनिधींनी दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व भाग (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय.

(३) अंदाजपत्रकासंदर्भात असलेल्या आक्षेपाची पूर्तता करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## अकलूज (जि.सोलापूर) येथे १०० बेडच्या रुग्णालयाच्या जागेस मान्यता देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत

**(११) * ७९३४ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकलूज (जि.सोलापूर) येथे १०० बेडच्या रुग्णालयाला दोन वर्षापूर्वी मान्यता मिळाली तथापि महसूल विभागाने जागेस मंजुरी अद्याप दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच रुग्णालयाच्या जागेस मान्यता देऊन निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. शासन निर्णय दिनांक ०९.०६.२०१४ अन्वये अकलुज जि.सोलापूर येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता दिलेली आहे. जागा मंजुरी बाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(२) जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी उपविभागीय अधिकारी, सोलापूर यांनी विहित नमुन्यात जागा मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत सूचित केले आहे. त्यानुसार अहवाल सादर करणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सदरहू रुग्णालयासाठी जागा प्राप्त करणेची कार्यवाही सुरु असून जागा प्राप्त झाल्यावर प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील व उपजिल्हा सामान्य रुग्नालयातील वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१२) * ८१४५ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०४३ ला दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरांच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) परिसरात ग्रामीण भागातील बऱ्याच प्राथमिक आरोग्य केंद्रातील व उपजिल्हा सामान्य रुग्नालय खामगांव येथील वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरीकांना शहरी भागातील रुग्णालयात उपचारासाठी जावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात १ सामान्य रुग्णालय (२०० खाटा) व १० प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असुन सदर संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण ३१ पदे मंजुर असुन येथे १९ स्थायी, ३ बंधपत्रीत, ३ अस्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत व ६ पदे रिक्त आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक ती वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते

(३) माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यात ६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदस्थापना देण्यात आली आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने नेमणुका देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**ठाणे व पालघर जिल्ह्यातील गरोदर, स्तनदा माता व अंगणवाडीतील बालकांना पूरक पोषण आहार देण्याबाबत**

**(१३) * ७७९६ श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गरोदर, स्तनदा माता व अंगणवाडीतील बालकांना पूरक पोषण आहार मिळावा यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत ठाणे व पालघर जिल्हा परिषदेस दरवर्षी १० ते १२ कोटींचा निधी दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालकांना आहार देताना त्यातील पौष्टिकता प्रयोग शाळेमार्फत तपासणी करुन घेणे बंधनकारक असताना नियम डावलला जात असल्याची बाब पालघर व ठाणे जिल्हा परिषदेच्या माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

घरपोच आहार (THR) व गरम ताजा आहार यासाठी ठाणे जिल्हा परिषदेस दरवर्षी १० ते १२ कोटी व पालघर जिल्हा परिषदेस दरवर्षी २० ते २२ कोटी खर्च होतो.

(२) हे खरे नाही.

गरोदर स्त्रिया, स्तनदा माता व अंगणवाडीतील बालकांना पुरक पोषण आहारांतर्गत (THR) पोष्टीकता प्रयोगशाळेमार्फत तपासणी करुनच पुरवठा केला जातो. प्रयोगशाळेतील तपासणी अहवालाशिवाय देयक पारित केले जात नाही.

गरम ताजा आहार बचतगटांकडून पुरवठा केला जात असलेल्या अन्नाची वर्षातून किमान दोनदा प्रयोगशाळेमार्फत तपासणी करुन घेणे व्यवहार्य नसल्यामुळे सदर तरतदीमध्ये दि. ३१ ऑक्टोंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्यात कार्यरत अंगणवाडी केंद्राच्या संख्येच्या प्रमाणात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने तसेच गरम ताजा आहार हा काही कालावधीत नाशवंत होत असल्यामुळे त्यांची साठवणूक करण्याची सोय अंगणवाडी प्रकल्प अथवा जिल्हास्तरावर नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक पुरवठाधारकाच्या गरम ताजा आहाराची वर्षातून दोन वेळा प्रयोगशाळेतून तपासणी करुन घेणे व्यवहार्य नाही.

आहाराची तपासणी करण्यासाठी अंगणवाडी परिक्षेत्रातील १० सदस्यांची माता समिती गठीत करुन आहार तपासणी करणेचे निर्देशित केलेले आहे. त्यामुळे बचतगटांची देयके माता समितीच्या अहवालाशिवाय अदा केली जात नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ढोकसांगावी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील शाळेला बनावट आयएसओ प्रमाणपत्र दिल्याबाबत**

**(१४) * ६७३४ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढोकसांगावी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील शाळेला बनावट पध्दतीने आयएसओ प्रमाणपत्र दिल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिरुर तालुक्यातील ७० ग्रामपंचायती, ७० अंगणवाडया व १४७ प्राथमिक शाळा यांना तातडीने आयएसओ प्रमाणपत्र वाटपाचे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी यांनी शिरुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

शिरुर तालुक्यातील ढोकसांगावी या गावातील जिल्हापरिषद शाळेस आयएसओ प्रमाणपत्र हे आंतरराष्ट्रीय संस्थेतून विहित निकष पूर्ण केल्याने देण्यात आल्याचे दिसून येते.

(२) नाही.

शिरुर तालुक्यातील १९ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ४ आंगणवाडी केंद्र व ३ ग्राम पंचायती यांना आयएसओ प्रमाणपत्र हे आंतरराष्ट्रीय संस्थेकडून विहीत निकष पूर्ण केल्याने देण्यात आले आहे.

(३) नाही, चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**बीड जिल्हयातील नायगाव मयूर अभयारण्यात वनविभागाच्या दुर्लक्षामुळे मोरांची संख्या कमी होत असल्याबाबत**

**(१५) * ७५३३ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील नायगाव मयूर अभयारण्यात १० हजार मोरांची संख्या असलेल्या या अभयारण्यात वनविभागाच्या (वन्यजीव) दुर्लक्षामुळे मोरांची संख्या झपाटयाने कमी होत असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मयूर अभयारण्यातील मोरांना वाचविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाचा कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही. सदर अभयारण्य क्षेत्रात मोरांसाठी आवश्यक त्या प्रमाणात खाद्य उपलब्ध आहे. त्यांच्याकरीता पिण्याच्या पाण्यासाठी ठिकठिकाणी बशीच्या आकाराचे कृत्रिम पाणवठे व सिमेंट कुंडया तयार करण्यात आल्या असून त्यात आवश्यकतेनुसार पाणी टाकण्यात येते, पाणवठयातील गाळ काढण्यात येतो. निरीक्षणासाठी निरीक्षण मनोरे, संरक्षणकुटी बांधण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केकतपांगरी (ता.गेवराई, जि.बीड) साठवण तलाव योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत**

**(१६) * ७५०५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ३६६९ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केकतपांगरी (ता.गेवराई, जि.बीड) साठवण तलाव योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत मा.राज्यमंत्री, जलसंधारण यांनी दिनांक २० मार्च, २०१५ रोजी त्यांच्या दालनात बैठकीचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंधारण विभागाकडून रॉयल्टीची रक्कम माफीचा प्रस्ताव मा.मंत्री, महसुल यांच्या मान्यतेस्तव पाठविण्याच्या सूचना मा.राज्यमंत्री यांनी दिल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वित्त विभागाच्या निकषाची पात्रता पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याकरिता जलसंधारण विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, दुष्काळ व तीव्र पाणी टंचाई या बाबी लक्षात घेवून योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी विशेष बाब म्हणून मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

मा. राज्यमंत्री, जलसंधारण यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी बैठक आयोजित केली होती.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) केकतपांगरी (ता.गेवराई, जि.बीड) साठवण तलाव योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या दृष्टीने मा. राज्यमंत्री, जलसंधारण यांनी बैठक घेवून संबंधीतांना कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी येथील जिल्हा शासकीय व ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१७) * ७२०८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुभाष झांबड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा तालुक्यातील (जि.रत्नागिरी) ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षकासह अन्य दोन वैद्यकीय अधिकारी अशी ३ पदे मंजूर असूनही दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी पासून एकही वैद्यकीय अधिकारी नसल्याचे तसेच दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी पासून चतुर्थश्रेणीची ३ पदे व वर्ग-२ चे १ पद अशी ४ पदे रिक्त असल्याचे दिनांक १० मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच रत्नागिरी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असून सद्यस्थितीत वर्ग १ ची १९ तर २ ची ५ पदे रिक्त असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रिक्त पदांमुळे ब-याचवेळा उपचाराविना गोरगरिब रुग्णांची परवड होत असून त्यांना नाईलाजाने वैद्यकीय सोईसुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, लांजा येथील ग्रामीण रुग्णालयात ग्रामीण जनतेला सोसाव्या लागणा-या असुविधा तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे गैरहजेरीबाबतचे तक्रार निवेदन दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास लांजा तालुका युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष तसेच स्थानिक नागरीकांनी तहसिलदार लांजा आणि वैद्यकीय अधिकारी, लांजा यांना याबाबत कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा लेखी निवेदनाद्वारे इशारा दिला आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत असल्यामुळे रुग्ण सेवेवर त्याचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाने उपरोक्त रुग्णालयांमधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय,

ग्रामीण रुग्णालय, लांजा, जि. रत्नागिरी येथील वैद्यकीय अधीक्षकाचे एक पद मंजूर असून ते रिक्त आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ ची ३ ही मंजूर पदे रिक्त होती. गट-ड संवर्गातील ७ पदे मंजूर असून ५ पदे भरलेली व २ पदे रिक्त होती.
(२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (वर्ग-१) संवर्गातील १८ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली होती. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची ३० पदे मंजूर असून १ बंधपत्रित व ३ अस्थायी पदांसह एकूण २३ पदे भरलेली होती.

(३) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय, लांजा येथे रिक्त पदे असताना ग्रामीण रुग्णालय, राजापूर व ग्रामीण रुग्णालय, रायपाटण येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विशेषज्ञांच्या सेवा मासिक व आवश्यकतेनुरुप नियमितपणे उपलब्ध करुन घेतल्या जातात.

(४) हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) दिनांक ६ व ७ जुलै, २०१५ रोजी वृत्तपत्रात जाहिरात देऊन मुलाखतीद्वारे ग्रामीण रुग्णालय, लांजा व जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी येथे प्रत्येकी ३ अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या महिला आर्थिक विकास महामंडळाला निधी देण्याबाबत

**(१८) * ७५७७ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महिला आर्थिक विकास महामंडळाला अवघा एक कोटी निधी शासनाने दिला परंतू यातून ते कर्मचाऱ्यांचे वेतनही भागवू शकत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महिला बचत गटांच्या सशक्तीकरणावर मोठा परिणाम होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या व्यवस्थापन अनुदानापोटी प्रतिवर्षी रु. १.०० कोटी इतका निधी मंजूर आहे. याव्यतिरिक्त माविममार्फत तेजस्विनी ग्रामीण महिला सक्षमीकरण योजना राबविण्यात येत असून या योजनेसाठी राज्यशासनाकडून देण्यात येणाऱ्या व्यवस्थापन अनुदानामधून माविमच्या कर्मचारी वृंदाचे वेतनाचा खर्च भागविण्यात येतो.

सदर योजनेची मुदत माहे सप्टेंबर २०१५ पर्यंत असून या योजनेस आणखी दोन वर्ष मुदतवाढ मिळण्यासाठी व व्यवस्थापन खर्चासाठी अतिरिक्त निधी मंजूर करण्यासाठी विभागामार्फत नियोजन व वित्त विभागास वारंवार प्रस्ताव सादर करण्यात आले असून याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच या योजनेच्या सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाच्या व्यवस्थापन खर्चासाठी लागणाऱ्या अतिरिक्त निधी करीता विभागाने नियतव्यय उपलब्ध करुन दिला असून तो पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### उमरखेड तालुक्यात (जि.यवतमाळ) पांदण रस्त्याची कामे सुरु करण्याबाबत

**(१९) * ७६०२ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.नरेंद्र पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-फशी आणि नागपूर-अंबाली (ता.उमरखेड,जि.यवतमाळ) या दोन पांदण रस्त्याची कामे रोजगार हमी योजनेतून मंजूर करण्यात आली आहे. मात्र ई-मस्टरची मागणी करुनही ते उपलब्ध करुन दिले जात नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उमरखेड तालुक्यातील (जि.यवतमाळ) शेती शिवारांना दळणवळणाच्या दृष्टीने जोडणाऱ्या ८० पांदण रस्त्यासाठी शासनाने १८ कोटी ६० लाख रुपये मंजूर केले असतानाही जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेने सदर कामे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत अद्याप सुरु केली नसल्याने मजूरांना कामे मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) या मागणीकरिता उमरखेड उपविभागीय कार्यालयासमोर ग्रामस्थांनी या मागणीसाठी आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, ई-मस्टर उपलब्ध करुन न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, उपरोक्त पांदण रस्त्यांची कामे सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) होय.

(५) रस्त्याचे ई-मस्टर दिनांक २९/०६/२०१५ रोजी काढण्यात आल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) पांदण रस्त्यांची कामे सुरु करण्याबाबत शासनाने यापुर्वीच दिनांक ४ मार्च, २०११ अन्वये सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार राज्यात पांदण रस्त्यांची कामे घेण्यात येत आहेत. नागपुर ते पळशी व नागपुर ते अंबाळी रस्त्याची चौकशी पुर्ण होईपर्यंत सदर रस्त्याचे काम थांबविण्यात आले होते. चौकशीनंतर रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आपटी (ता.कल्याण) गावानजीकच्या कातकर वाडीतील रहिवाशांना मुलभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(२०) * ६८६० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आपटी (ता.कल्याण) गावाच्या नजीक कातकरी वाडीतील स्थानिक भूमिपुत्र अद्यापपर्यंत घरपट्टी, रेशनिंग कार्ड आणि पिण्याच्या पाण्यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण पंचायत समितीत १० ते १२ विभाग असताना आपटी गावाजवळच्या या आदिवासी बांधवांना अद्याप एकही शासकीय व मुलभूत सुविधा उपलब्ध का होऊ शकली नाही याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीनुसार अद्यापपर्यंत सुविधांपासून वंचित असलेल्या या कातकरी बांधवांना मुलभूत सुविधा व घरकुल देण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) अशी बाब नाही. शासनाकडून मंजूर झालेल्या सर्व मूलभूत सुविधा पंचायत समिती कल्याण मार्फत आपटी गावाजवळच्या आदिवासी बांधवांना पुरविण्यात येतात.

आपटी गावानजीकच्या कातकरी वाडीतील लोकसंख्या २७४ व कुटुंब संख्या ५८ आहे. सदर ५८ कुटुंबांना घरपट्टी लावण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे या आदिवासी बांधवांसाठी विद्युत सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, वैयक्तीक शौचालय सुविधा रस्ते व गटार सुविधा, अंगणवाडी सुविधा, आरोग्य सेवा, शालेय सुविधा इ. सुविधा पुरविण्यात येतात. तसेच, इंदिरा आवास योजनेअंतर्गत कातकरी वाडीतील २६ कुटुंबांना घरकुल सुविधा देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशिम जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेली अनियमितता

**(२१) * ७३८२ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कृषी विभागात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील जलयुक्त शिवार योजनेतंर्गत निवड झालेली गावे चुकीच्या पद्धतीने व कृषी विभागाच्या मर्जीनुसार झाली असून गोवा कृषी विभागाने विदर्भ सघन सिंचन कार्यक्रमामध्ये मागील दोन वर्षापासून निवड केलेली गावे आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयातील सर्व कृषी विभागाच्या कामाची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नेमण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्य, वाशिम यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत वाशिम जिल्ह्यात २०० गावांची निवड शासनाने दिलेल्या निकषानुसार झाली आहे. त्यात विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम आणि विविध पाणलोट विकास योजनांमधील गावांचा समावेश आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महिलांना आरोग्यसेवेचा लाभ मिळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र महिला रुग्णालय मंजूर करण्याबाबत**

**(२२) * ७३१० श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित स्वीकृत प्रश्न क्रमांक ४००२ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराकडे लक्ष वेधून** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांना आरोग्यसेवेचा लाभ देण्यासाठी तत्कालीन आघाडी सरकारने प्रत्येक जिल्हा स्वतंत्र महिला आणि बालकल्याण रुग्णालयाला मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात केवळ ८ जिल्ह्यात महिला रुग्णालय कार्यरत असून १४ स्वतंत्र १०० खाटांच्या महिला रुग्णालयांना मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) तसेच दिनांक १७ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहत आराखड्यानुसार भंडारा येथे १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालयास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील भिलेवाडा येथे शिशू आणि महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालय मंजूर होऊन दोन वर्षे होऊन जागेचा प्रश्न निकाली न निघाल्याने प्रत्यक्षात कामाला सुरुवात होऊ शकली नाही, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तातडीने महिला व शिशूंसाठी रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १७/०१/२०१३ अन्वये १५ जिल्ह्यांच्या ठिकाणी १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालयास मान्यता देण्यात आली आहे.
(४) हे खरे आहे.
(५) व (६) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १७.०१.२०१५ अन्वये बृहत आराखडयामध्ये भंडारा येथे १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालय मंजूर असून सदर रुग्णालयासाठी जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उमरखेड तालुक्यातील (जि.यवतमाळ) विडूळ प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर नसल्याने रुग्णांची होणारी गैरसोय**

**(२३) * ७९०८ श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड तालुक्यातील (जि. यवतमाळ) २० हजार लोकसंख्या असलेल्या विडूळ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टरच नसल्याने उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉक्टर नसल्याने रुग्णांना खाजगी डॉक्टरांकडून उपचार करुन घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णांची गैरसोय थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही

प्राथमिक आरोग्य केंद्र विडूळ जि.यवतमाळ येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची २ पदे मंजूर आहेत. त्यापैकी एका पदावर स्थायी (गट-ब) व दुसऱ्या पदावर अस्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक ती वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**शासनाने निश्चित केलेल्या दरांपेक्षा जास्त दर घेणाऱ्या रक्त पेढयांवर कारवाई करण्याबाबत**

**(२४) * ७८२२ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक १६३३ ला दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरांच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेच्या प्रस्तावानुसार एका रक्त पिशवीचा दर १०५० रुपयावरुन ८५० रुपये इतका करण्यात आला असला तरी खाजगी रक्त पेढयांमधून पुरविण्यात येणाऱ्या रक्त पिशवीचा दर रु. १४५० इतकाच निश्चित केला असला तरी अधिक दराने रक्त पिशवी विकली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जादा दराने रक्त पिशवीची विक्री करणाऱ्या खाजगी रक्त पेढीविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे खरे आहे.

(२) अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यातील ३१० रक्तपेढ्यांची चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान ६९ रक्तपेढ्या दोषी आढळल्या. सदर रक्तपेढ्या शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर आकारत असल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली होती. त्यास अनुसरुन या सर्व रक्तपेढ्यांनी शासनाचेच दर लागू केले जातील असे लेखी हमीपत्र दिले आहे. त्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विदर्भातील लोअर पैनगंगाप्रकल्पाच्या कामाबाबत**

**(२५) * ७१३१ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील लोअर पैनगंगा ह्या मोठया प्रकल्पाच्या कामाला सुरवात झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाविषयी शासनाची भूमिका काय आहे,

(३) असल्यास, बाधीत शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सन २०१५-२०१६ या वर्षाकरीता किती तरतूद करण्यात आली आहे वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

मुख्य धरणाच्या प्राथमिक कामास माहे जुलै, २०११ मध्ये सुरुवात करण्यात आली होती. तथापि धरण विरोधी संघर्ष समितीने सदर काम दिनांक ७/५/१२ रोजी बंद पाडले. तेव्हापासून सदर काम बंद आहे.

(२) प्रकल्पासंबंधीत लोकप्रतिनिधींची एकत्रित बैठक घेऊन प्रकल्पाचे काम सुरु करण्यात येईल.

(३) या प्रकल्पांतर्गत बाधीत ४६ गावांचे तीन टप्यात पुनर्वसन नियोजित आहे. त्यापैकी प्रथम टप्प्यातील १२ गावांच्या पुनर्वसनाचे काम प्राधान्याने हाती घेण्यावे नियोजन आहे.

(४) या प्रकल्पास सन २०१५-१६ या वर्षाकरीता रु. ८.७५ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रकल्पास दिनांक २६/६/१९९७ रोजी प्रशासकीस मान्यता मिळाल्यानंतर भूसंपादन, वनजमीन हस्तांतरण तसेच वैधानिक मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीत होती. आता वैधानिक मान्यता तसेच भूसंपादन व वनजमिन हस्तांतरणाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे. प्रकल्पासंबंधी संबंधित लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन प्रकल्प काम पुन्हा सुरु करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**राज्यात दर हजार पुरुषांमागे मुलींची संख्या कमी होत असल्याबाबत**

**(२६) * ७३६३ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दर हजार पुरुषांमागे मुलींची संख्या कमी असल्याचे दिसून येत असून मुंबई सारख्या राजधानीच्या शहरात हे प्रमाण कमी असल्याचे निष्पन्न झाले असतानाच महाराष्ट्रातील इतर महत्वाच्या जिल्ह्यांमध्येही हे प्रमाण अधिकच कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुली राज्यात, राज्याबाहेर गर्भपाताने संपविल्या गेल्या की, बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या औषधी मात्रांनी त्यांना नष्ट केले गेले अशा कुशंका उपस्थित केले जात असल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मुलीचे जन्माचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे. सन २००१ च्या जनगणनेच्या तुलनेत सन २०११ च्या जनणगणनुसार हे प्रमाण कमी आहे. ते पुढील प्रमाणे :-

| | **२००१** | **२०११** |
|---|---|---|
| मुंबई | ९२२ | ९१४ |
| महाराष्ट्र | ९१३ | ८९४ |

सातारा, कोल्हापूर,सांगली व चंद्रपूर हे जिल्हे वगळता इतर उर्वरित जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण कमी झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात मुलीचे जन्माचे प्रमाण वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत २००९ समुचित प्राधिकाऱ्यांची नियुक्ती (जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक, अप्पर जिल्हाधिकारी, तहसीलदार इ.) करण्यात आलेले असून त्यांना कायद्याचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे सदर कायद्याच्या कलम १६ (अ) नुसार मा. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २५ सदस्यांचा समावेश असलेल्या राज्यपर्यवेक्षकीय मंडळाची पूर्नस्थापना करण्यात आलेली आहे.

राज्यसमुचित प्राधिकाऱ्यांस सल्ला आणि मदत करण्यासाठी राज्यसल्लागार समिती स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

या व्यतिरिक्त सोनोग्राफी केंद्रांची तीमाही तपासणी सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांची धडकमोहिम तपासणी समुचित प्राधिकाऱ्यांकडून पार पाडली जाते.

पीसीपीएनडीटी कायद्यांच्या अमंलबजावणीसाठी व लिंग निवडीस प्रतिबंध करण्याठी मेळावे, सभा, पथनाटय, कार्यशाळा, रॅली या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथकाची स्थापना करण्यात आलेली असून दरमहा होणाऱ्या बैठकीद्वारे कार्याचा आढावा घेण्यात येतो.

पीसीपीएनटीटी कायद्याच्या भंग करणाऱ्याविरुध्द केसेस दाखल करण्यात आलेल्या असून काही प्रकरणांमध्ये दोषी व्यक्तिंना सश्रम कारावास तसेच दंड यासारख्या शिक्षा देण्यात आल्या आहेत.

पीसीसीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीकरिता पुरक योजना तयार करण्यात आली असून त्याकरिता रु. १२३.९६ लक्ष एवढी तरतुद करण्यात आली आहे.

मुलींच्या जन्माला उत्तेजन देण्यासाठी राज्यात शासनामार्फत सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना राबविण्यात येते.

सर्व सामान्य लोकांना तक्रार नोंदविण्यासाठी www.amchimulgi.gov.in ही वेबसाईट तयार करण्यात आली असून त्यावर प्राप्त होणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यात येते. सदर संकेतस्थळावर तक्रारीचा पाठपुरावा करण्याची सुविधा उपलब्ध आहे. पीसीपीएनडीटी कायद्यांसंदर्भात हेल्पलाईन कक्षाची स्थापना करण्यात आली असून सर्व सामान्य लोकांना तक्रार नोंदविण्यासाठी एक टोल फ्री नंबर देण्यात आलेला आहे.

सोनोग्राफी आणि इमेजिंग मशीन निर्मीती वितरक यांना राज्य समुचित प्राधिकाऱ्यांकडे नोंदणी करणे बंधनकारक केले आहे. तसेच राज्य समुचित प्राधिकाऱ्यांकडे  नोंदणी असलेल्या व्यवसायीकांकडूनच सोनोग्राफी मशीन खरेदी करणे बंधनकारक केलेले आहे.

सर्व सोनोग्राफी केंद्रांना ऑनलाईन फॉर्म भरणे बंधणकारक करण्यात आले असून, माहे जुन, २०१५ अखेर एकूण ६८२६ इतकी ऑनलाईन नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रे आहेत. तसेच ऑनलाईन ए आणि एफ फॉर्म साठी http://pcpndt.maharashtra.gov.in ही वेबसाईट सुरु करण्यात आलेली आहे.

-----------------

**वसई (जि.ठाणे) येथे पाणजू बेटावर आरोग्य केंद्राच्या विस्तारासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) * ६९७२ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.ठाणे) येथे पाणजू बेटावर असलेला आरोग्य केंद्राच्या विस्तारासाठी योग्य अशी जागा उपलब्ध नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन आरोग्य केंद्राच्या विस्तारासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. पाणजू बेट ता.वसई येथील प्राथमिक आरोग्य पथक हे पाणजू बेटाच्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या तळमजल्यावर कार्यरत असून सदर पथकामार्फत रुग्णांना सेवा दिल्या जात आहेत.

(२) व (३) वसई (जि.ठाणे) येथे पाणजू बेटावर असलेल्या आरोग्य केंद्राच्या पथकासाठी इमारत बांधणेकरिता सुयोग्य जमीन उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही चालु आहे.

-----------------

**वसई-विरारच्या समुद्रकिनाऱ्यावरील सुरुच्या वृक्षांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली तोड**

**(२८) * ६७९१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरारच्या समुद्रकिनाऱ्यावरील सुरुच्या वृक्षांची मोठ्या प्रमाणावर तोड होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात क्षयरोग नियंत्रण अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत**

**(२९) * ६९११ श्री.अनंत गाडगीळ, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामराव वडकुते, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात संसर्गजन्य रोगांमध्ये सर्वाधिक रुग्ण क्षयरोगाने मृत्यूमुखी पडतात यावर नियंत्रण ठेवण्यासाठी देशपातळीवर १९९३ पासून सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहेत परंतु राज्यात जिल्हा क्षयरोग अधिकाऱ्यांच्या २१ जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे केव्हापासून रिक्त आहेत व ते रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यात क्षयरोगाचा धोका सातत्याने वाढत आहे त्याला निर्बंध घालण्यासाठी जिल्हा क्षयरोग अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे का वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रम सन २००३ पासून राबविण्यात येत असून जिल्हा क्षयरोग अधिकाऱ्यांच्या एकूण ३३ मंजूर पदांपैकी १० पदे भरलेली असून २३ पदे रिक्त आहेत.

(२) सन २०१२ मध्ये या संवर्गात ३३ पदे रिक्त होती. त्यापैकी २३ पदांवर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली होती. त्यानंतर पदोन्नती नाकारणे, सेवानिवृत्ती व बदली या कारणांमुळे या संवर्गातील रिक्त पदांची संख्या आजमितीस २३ झाली आहे.

(३) जिल्हा क्षयरोग अधिकाऱ्यांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नॅशनल पार्क, बोरिवली (मुंबई) येथील आदिवासी पाडयांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३०) * ८२०४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल पार्क, बोरिवली (मुंबई) परिसरातील आदिवासी पाडे परिसरातील झोपडीधारकांच्या झोपडया सन २००० मध्ये पाडल्याप्रकरणी त्याचे पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मा.वनमंत्री यांचेकडे दिनांक २ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नॅशनल पार्क, बोरिवली (मुंबई) परिसरातील आदिवासी पाडे परिसरातील झोपडीधारकांच्या झोपडया सन २००० मध्ये पाडल्याप्रकरणी त्याचे पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदानाद्वारे दिनांक २४.०४.२०१५ रोजी मा. मंत्री (वने) यांच्याकडे करण्यात आली आहे. तथापि सन २००० मध्ये कोणत्याही आदिवासी पाडयामध्ये निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली नाही.

(२) मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशान्वये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे हे अतिक्रमित पाडे असल्याने त्यांचे पुनर्वसन उद्यानाबाहेर करावयाचे आहे. त्या अनुषंगाने आदिवासी समाजाच्या रुढी व परंपरा लक्षात घेता त्यांचे इतर अतिक्रमकांप्रमाणे पुनर्वसन न करता उद्यानाच्या हद्दीजवळील आरे कॉलनी येथील १९० एकर जागेपैकी ४३ एकर क्षेत्रामध्ये करण्याचे प्रस्तावित असून त्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडयांना पुरविण्यात आलेली निकृष्ट दर्जाची चिक्की

**(३१) * ७१०३ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.माणिकराव ठाकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.अनंत गाडगीळ, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडयांमधील मुलांना आणि ग्रामीण भागातील महिलांना चिक्की पुरविण्यासाठी ८० कोटी रुपयांचे कंत्राट निविदा पध्दत न अवलंबिता दर करार (रेट कॉन्ट्रॅक्ट) पध्दतीने दिल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ज्या पुरवठा कंपनीने गेली काही वर्षे निकृष्ट दर्जाच्या चिक्कीचा पुरवठा केला त्याच कंपनीला पुन्हा कंत्राट देण्यात आले व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत लहान बालकांना वाटप करावयाच्या चिक्की पुरवठाचे कंत्राट सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथील संस्थेस देण्यात आले असल्याचे आणि सदर संस्थेने माहे मार्च, २०१५ मध्ये सादर केलेल्या ८० कोटी रुपयाचे देयक त्याच महिन्यात नवी मुंबईच्या बेलापूर येथील आयुक्त कार्यालयाने मंजूर करुन कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात आली असल्याचे दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे चिक्की तयार करुन पुरवठा करणे यासाठी प्रती किलो रुपये १४० इतका खर्च येत असताना संबंधित कंत्राटदारास रुपये २६०/- प्रती किलो या दराने रक्कम अदा करुन यामध्ये कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे, हेही खरे आहे काय,

(४) तसेच अहमदनगर जिल्ह्यातील अंगणवाडीतील बालकांना पुरविण्यात येणारी राजगिरा चिक्की मातीमिश्रित असल्याने सदर प्रकरणी जिल्हा परिषदेच्या जनव्यवस्थापन समितीच्या बैठकीत दिनांक ५ जून, २०१५ रोजी चर्चेस येवून महिला व बालकल्याण सभापती यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच राज्यातील अंगणवाड्यांना गरम आहारपुरवठा करणाऱ्या महिला बचत गटांचे सुमारे १०० कोटींचे देयक गेल्या ८ महिन्यांपासून महिला व बाल कल्याण विभागाकडून महिला बचत गटांना अदा करण्यात आले नसल्याचे दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच महिला बचत गटांच्या थकित देयक देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दि. १३/०२/२०१५ अन्वये CSPO ने निश्चित केलेल्या दरानुसार रु.५२ कोटीची मायक्रोन्युट्रियन्ट चिक्की व रु.२३ कोटीची राजगिरा चिक्की खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई (CSPO) यांनी दि. ०८/०८/२०१२ च्या परिपत्रकान्वये निश्चित केलेल्या दराने मे.सुर्यकांता महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, वेंगुर्ला जि.सिंधुदूर्ग या संस्थेकडून रु.५२ कोटीची मायक्रोन्यट्रियन्ट चिक्की व रु.२३ कोटीची राजगिरा चिक्की खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मे.सुर्यकांता महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या, वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदूर्ग यांना आतापर्यंत पुरवठा केलेल्या मालाचे रु. ३१,७२,८४,५८५/- एवढ्या रक्कमेची देयक अदा करण्यात आलेली आहेत. सदर पुरवठा संस्थे कडून मागील वर्षात निकृष्ट दर्जाची चिक्की पुरवठा झाल्याबाबतची तक्रार या विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई (CSPO) यांनी दिनांक ०८/०८/२०१२ च्या परिपत्रकान्वये मायक्रोन्युट्रीयन्ट चिक्कीसाठी रु. २८.५० (प्रति १०० ग्रॉम) व राजगिरा चिक्कीसाठी रु.२१.५० (प्रति १०० ग्रॅम) असा दरनिश्चित केलेला असल्यामुळे सदर दरनिश्चितीप्रमाणे खरेदीस मान्यता देण्यात आली आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

सभापती, नगर पंचायत समिती यांनी दि. ५/६/२०१५ रोजीच्या झालेल्या जलव्यवस्थापन सभेमध्ये राजगिरा चिक्की निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार केली. त्यानुसार प्रकल्प स्तरावर चौकशी करुन दि. ०५/०६/२०१५ पासून राजगिरा चिक्कीचे वाटप बंद करण्यात आले व चिक्कीचे नमूने पंचनामा करुन प्रकल्पस्तरावर ठेवण्यात आले. दि. २०/०६/२०१५ रोजी अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांच्या समक्ष पंचनामा करुन शासकीय प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले.

अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील अंगणवाडीमधील पुरवठा करण्यात आलेल्या राजगिरा चिक्कीमध्ये मातीमिश्रीत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने मे.सुर्यकांता महिला औद्योगिक सहकारी चिक्की संस्था मर्या, वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग यांना राजगिरा चिक्की पुर्णपणे बदलून देण्याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दि.१५/०६/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार पुरवठादाराकडून राजगिरा चिक्की पुर्णपणे बदलून देण्यात आलेली असून चांगल्या चिक्कीचा पुरवठा प्राप्त झाल्याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी, ता.पाथर्डी, जि.अहमदनगर यांनी त्यांच्या दि.०८.०६.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच जिल्ह्यामध्ये प्रत्यक्ष भेट देऊन ज्या ज्या ठिकाणी खराब मालाचा पुरवठा झालेला आहे. त्या त्या बॅचचा माल तात्काळ बदलून देण्याबाबत तसेच पुरवठा करतांना प्रत्येक बॅचच्या मालाची लॅब टेस्टींग करुन त्यानंतरच पुरवठा करण्याबाबत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी दि.२६.०६.२०१५ च्या पत्रान्वये संबंधित पुरवठाधारक संस्थेस कळविले आहे. जिल्हा परिषद अहमदनगर यांचेमार्फत अंगणवाडीस पुरवठा झालेल्या चिक्कीचा पंचनामा करुन पुणे व नाशिक येथील शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. त्यांचे अहवाल प्राप्त झालेले असून प्रयोगशाळा अहवालानुसार राजगिरा चिक्कीमध्ये कॅलरिज व प्रथिने दरकरारामध्ये नमूद केल्यानुसार आहे.

(५) व (६) हे खरे नाही.

माहे मार्च, २०१५ अखेर जिल्हास्तरावर गरम ताजा आहार पुरवठा करणाऱ्या महिला मंडळ/महिला बचत गट यांचे देयक अदा करणेसाठी प्राप्त झालेल्या संपूर्ण निधीचे वितरण करण्यात आले होते. नागरी प्रकल्पांसाठी काही प्रमाणात निधी कमी प्राप्त झालेला होता. माहे एप्रिल, २०१५ मध्ये निधी प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी यांचे मागणीनुसार निधी वितरीत करण्यात आलेला आहे. प्रलंबित देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संग्राम प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायतीचे काम ऑनलाईन करणाऱ्या संगणक परिचालकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(३२) * ७०७२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे संग्राम प्रकल्पांतर्गत ग्रामपंचायतींचा कारभार ऑनलाईन करण्याचे काम संगणक परिचालकांवर सोपविण्यात आले आहे. या संगणक परिचालकांना शासन सेवेत समाविष्ट करुन घेणे, ३६ महिन्यांचे थकीत मानधन शासन परिपत्रकानुसार अदा करावे इ. मागण्यांसाठी जिल्हा परिषदेवर मोर्चा काढल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संगणक परिचालकांना शासन सेवेत सामावून घेणे, तसेच त्यांचे थकीत मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) शासन निर्णयात नमुद रु. ८०००/- हे फक्त संगणक परिचालक (VLE) च्या मानधनासाठी नाही. यात प्रशिक्षण बैठका, आज्ञावली विकसन, कागद टोनर इ. सर्व खर्चाच्या बाबी अंतर्गत आहेत. याबाबतचा दि. २७ मे, २०१४ चा शासन निर्णय स्वयंस्पष्ट आहे. त्यामुळे ३६ महिन्याचे थकीत मानधन अदायगीबाबतचा प्रश्न उद्‌भवत नाही.

तसेच सदर शासन निर्णयामध्ये स्पष्ट केलेनुसार ई-पंचायत प्रकल्पाअंतर्गत महाऑनलाईन मार्फत कंत्राटी सेवेवर नेमलेले तांत्रिक मनुष्यबळ हे राज्यशासन, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांचे कंत्राटी कर्मचारी नाहीत. ते गाव पातळीवरील उदयोजक (VLE) आहेत. ई-पंचायत प्रकल्पावर काम केल्यामुळे त्यांना राज्य शासन अथवा पंचायती राज संस्थामध्ये कंत्राटी अथवा कायम कर्मचारी म्हणून मागणी करण्याचा कोणताही अधिकार असणार नाही.

शासन परिपत्रक दि. २६ फेब्रुवारी, २०१५ व शासन शुध्दीपत्रक दि. २ मार्च, २०१५ नुसार उदिष्टपूर्ती करणाऱ्या संगणक परिचालकांचा (VLE) मोबदला दरमहा रक्कम रु. ४५००/- इतका करण्यात आलेला आहे. तसेच थकीत देयक अदायगीबाबत मार्गदर्शक सुचनांचे परिपत्रक दि. १३.५.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

तसेच १३ व्या वित्त आयोगाचा शिल्लक निधी वापरुन प्रचलित धोरणानुसारच प्रकल्प अमंलबजावणीसाठी सप्टेंबर, २०१५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्ह्याच्या आरोग्य विभागात अधिकारी व कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३३) * ८२३७ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात एप्रिल, २०१५ पासून सतत उष्णतेचा पारा वाढत असल्याने मलेरियासह गॅस्ट्रो, डिसेंट्री व डायरियांच्या रुग्णांत वाढ होत आहे. जिल्ह्याच्या आरोग्य विभागात मोठया प्रमाणात कंत्राटी व अस्थायी कर्मचारी व आरोग्य अधिकाऱ्यांची तीन महिन्यांचा कालखंड लोटूनही पुनर्नियुक्तीचे आदेश न मिळाल्याने पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुनर्नियुक्तीचे आदेश न दिल्यामुळे आरोग्य विषयक कामावर त्याचा परिणाम होऊन रुग्णांचे हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

गोंदिया जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये कंत्राटी तत्वावरील एकूण ६४९ अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून त्यांचे पुनर्नियुक्ती आदेश देण्यात आले असून कंत्राटी तत्वावरील सर्व पदे भरलेली आहेत.

तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ पदावरील राज्यातील सर्व अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना पुनर्नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्याबाबतचे आदेश शासनामार्फत आरोग्य सेवा संचालनालयास देण्यात आले असून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

गोंदिया जिल्ह्यातील उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक त्या रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण तालुक्यातील (जि.औरंगाबाद) ब्रम्हपुरी उपसा जलसिंचन योजनेस निधी मिळण्याबाबत

**(३४) * ७४५२ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (औरंगाबाद) तालुक्यातील ब्रम्हपुरी उपसा जलसिंचन योजना पूर्णत्वासाठी १०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपसा जलसिंचन योजनेस १०० कोटी रुपयांचा निधी देऊन काम पुर्ण केल्यास १९००० हेक्टर जमीन ओलीता खाली येऊन ५० गावांची पिण्याच्या पाण्याची टंचाई दुर करता येऊ शकेल, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) पैठण तालुक्यात ब्रम्हपुरी उपसा जलसिंचन अशी योजना नाही. तथापि या तालुक्यात ब्रम्हगव्हान उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर योजनेच्या कामांची उर्वरित किंमत सुमारे रु. २८४ कोटी आहे.

(२) या योजनेची प्रकल्पीय सिंचन क्षमता १८,७७८ हेक्टर असून या योजनेमुळे ५५ गावांची पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होणार आहे.

(३) योजनेसाठी सन २०१५-१६ मध्ये रु. १५.४० कोटी अर्थसंकल्पित करण्यात आले आहेत.

(४) अर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल महोदयांचे निदेश यानूसार निधी उपलब्ध करुन योजनेची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## ठाणे येथील सिव्हिल रुग्णालयात शवविच्छेदनाचे केंद्र सुरु करण्याबाबत

**(३५) * ७५६० ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सिव्हील रुग्णालयात शवविच्छेदनाच्या (पोस्टमार्टम) महिन्याला सुमारे २०० ते ३०० केसेस होऊन वर्षाला जवळपास ४००० पोस्टमार्टमच्या केसेस येत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे येथील सिव्हील रुग्णालयात पोस्टमार्टमचे सेन्टर नसल्यामुळे मयत रुग्णांच्या नातेवाईकांना पोस्टमार्टमसाठी राजावाडी व जे.जे. रुग्णालयात जाण्यावाचून पर्याय राहत नसल्याचे व त्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांची बरीच धावपळ होऊन वेळ व पैसाही नाहक खर्च होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी असून ठाणे येथे शवविच्छेदन केंद्र निर्माण करण्यात यावे, अशी नागरीकांची आग्रही मागणी असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ व माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे सिव्हील रुग्णालयात घाटकोपर (मुंबई) येथील राजावाडी हॉस्पिटलच्या धर्तीवर ठाणे सिव्हील रुग्णालयामध्ये शवविच्छेदनाचे केंद्र सुरु करण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक वि.सा. सामान्य रुग्णालय, ठाणे यांचेकडून दिनांक ९ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय यांचेकडे तसा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही. वि.सा.सामान्य रुग्णालय, ठाणे येथील शवविच्छेदनाचे केंद्रात दरमहा अंदाजे सरासरी १२५ ते १३० शवविच्छेदन केसेस होतात. म्हणजेच वर्षाला सर्वसाधारणपणे १३०० ते १४०० शवविच्छेदन होतात.

(२) हे खरे नाही. एन्काउंटर मृत्यू, पोलीस कस्टडी किंवा ताबा मृत्यू, पोलीस फायरींग मृत्यू आणि नातेवाईकांनी आग्रह धरल्यास मृतदेह शवविच्छेदनासाठी जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे पाठविण्यात येतो. इतर कोणतेही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयाबाहेर पाठविण्यात येत नाहीत.

(३) नविन शवागार व शवविच्छेदन केंद्र बांधण्याच्या प्रस्तावाची छाननी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### औरंगाबाद जिल्ह्यातील आरोग्य उपकेंद्र त्वरीत सुरु करण्याबाबत

**(३६) * ७२२६ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागाने सन २०१३ मध्ये आरोग्य उपकेंद्राचा बृहतआराखडा मंजूर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्यात औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील वैजापुर ग्रामीणसह १२ नवीन उपकेंद्राचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर १२ नवीन उपकेंद्रापैकी फक्त ४ नवीन उपकेंद्रे सुरू झाली असून उर्वरीत ८ उपकेंद्राबाबत कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर नवीन उपकेंद्रे कार्यान्वीत करण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील सातारा-देवळाली ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर झाले. साता-यात जिल्हा प्रशासनाचे आरोग्य उपकेंद्र होते. सदर उपकेंद्र नगरपरिषदेकडे आल्याने बंद पडले आहे. त्यामुळे परिसरातील रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

बृहत आराखडयात मंजूर १२ आरोग्य उपकेंद्रांपैकी ४ उपकेंद्रे सुरु झाली आहेत. उर्वरीत ८ उपकेंद्रांपैकी कनकसाज व बांजरगाव या दोन उपकेंद्रांना जागा प्राप्त झाली असून बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत प्रस्तावित आहे. तर हाडस पिंपळगाव, नायगव्हाण, पानवी, वैजापूर (ग्रा), वाकला व लाख खंडाळा या ६ उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध होणेबाबत संबंधित ग्रामपंचायती व तालुका आरोग्य अधिकारी यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) हे खरे नाही.

सातारा-देवळाली ही गावे ग्रामपंचायतीमधून औरंगाबाद महापालिकेच्या कार्यकक्षेत आली असून प्राथमिक आरोग्य केंद्र, कचनेरच्या अंतर्गत येणाऱ्या उपकेंद्र, सातारा मार्फत बाळापूर, गांधेली, बेगानईक, शिंदोन, भिंदोन व भिंदोनतांडा या सहा गावांना आरोग्य सेवा देण्यात येतात.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण तालुक्यात इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याची रक्कम मिळण्याबाबत

**(३७) * ८३१५ श्री.अनिल तटकरे, श्री.गुरुमुख जगवानी : तारांकित प्रश्न क्रमांक ३८३८ ला दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण तालुक्यात सन २०१३-१४ मध्ये इंदिरा आवास योजने अंतर्गत १९७ लाभार्थ्यांची घरे पूर्ण होऊनही दुसऱ्या हप्त्याची रक्कम लाभार्थ्यांना अद्याप मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याची रक्कम देण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) अद्याप चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.

ज्या १९७ कुटूंबांना प्रथम हप्ता अदा करण्यात आलेला आहे ती सर्व कुटूंबे इंदिरा आवास योजनेचा लाभ मिळण्यासाठी असलेले दारिद्रय रेषेखाली असणे, घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा असणे हे निकष पूर्ण करतात. परंतु सदर कुटूंबांचा समावेश इंदिरा आवास योजनेच्या कायम प्रतिक्षा यादीत नसल्याने त्यांना दुसरा हप्ता अदा करण्यात आलेला नाही. या १९७ कुटूंबांबरोबरच योजनेचे निकष पूर्ण करणाऱ्या पात्र कुटूंबांचा समावेश इंदिरा आवास योजनेच्या सुधारित यादीत करण्याचा प्रस्ताव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांनी विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडे पाठविला आहे.

शासन परिपत्रक दि. ८.९.२००८ व शासन निर्णय दि. ३.१.२००९ अन्वये योजनेच्या सुधारित यादीस मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांना देण्यात आले आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग यांनी प्रस्तावित केलेल्या सुधारित यादीस विभागीय आयुक्त यांची मान्यता मिळाल्यानंतर सदर कुटूंबांना योजनेचा दुसरा हप्ता अदा करण्यात येईल.

विभागीय आयुक्त, कोकण यांनी मंजूर केलेल्या प्रतिक्षा यादीमध्ये सदरच्या १९७ लाभार्थ्यांचा समावेश नसल्याने झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायगड येथे स्वाईन फल्यूमुळे आतापर्यंत ८ जणांचा झालेला मृत्यू**

**(३८) * ७१६० श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड येथे स्वाईन फ्ल्यूमुळे आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला असून ६९ जणांना लागण झाली आहे तर ५ हजार ९० रुग्ण तापसरीच्या साथीने बाधित असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वाईन फ्ल्यूची साथ रोखण्यासंदर्भात शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे खरे आहे.

रायगड जिल्हयात एप्रिल २०१५ अखेर स्वाईन फ्ल्यू साठी ५७१२ रुग्ण स्क्रिनिंग केले असून त्यापैकी ८३ संशयीत रुग्णांच्या तपासणीत २४ रुग्ण पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. जानेवारी ते एप्रिल २०१५ या कालावधीत रायगड जिल्हयात स्वाईन फ्ल्यूमुळे १५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

(२) स्वाईन फ्ल्यू साथ प्रतिबंधासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना.

- ७० स्क्रिनिंग सेंटर व ६ विलगिकरण कक्षाची स्थापना
- डॉक्टर्स व आरोग्य कर्मचा-यांना इन्फ्लयूएन्झा प्रतिबंधक लसीकरण
- पुरेसा औषधसाठा

- शासकीय व खाजगी डॉक्टरांचे प्रशिक्षण
- सहवासितांचा शोध व उपचार
- आरोग्य शिक्षण

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प कोअर झोन अंतर्गत ओबीसी व अन्य प्रवर्गास गॅस सवलत मिळण्याबाबत**

**(३९) * ७२८१ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत येणा-या कोअर झोन हद्दीतील निस्तार हक्क लागु असलेल्या वन भूभागामधून नागरीकांना इंधनासाठी वैरण तोडण्यास मज्जाव करण्यात आल्याने वन विभागामार्फत दैनंदीन वापराकरीता इंधनाचा गॅस सवलतीच्या दरात वाटप करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सवलतीच्या दरात मिळणा-या इंधन गॅसवरील ओ.बी.सी. व इतर प्रवर्गातील लाभार्थ्यांना देण्यात येणारी सवलत ब-याच दिवसांपासुन प्रलंबीत असुन अनेक गावांना सवलतीचा निधी उपलब्ध न झाल्यामुळे इंधनाचा गॅस वितरीतच झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नागरीकांना वन विभागामार्फत इंधनगॅसचे वितरण तसेच ओबीसी व इतर प्रवर्गातील लोकांना इंधनगॅसच्या सवलतीचे वाटप सुरळीत होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) व (३) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील फक्त रानतळोधी, पळसगांव व कोळसा ही गावे कोअर क्षेत्रात मोडतात. या गावांच्या ऐच्छिक पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु आहे. पळसगांव येथील ९३ लाभार्थ्याना (१०० टक्के लाभार्थ्यांना) इंधनाचा गॅस सवलतीच्या दरात वितरीत करण्यात आला आहे. तसेच पुरवठा करण्यात आलेल्या इंधन गॅससाठी सवलतीचे दरात गॅस हंडा (सिलेंडर गॅस) भरुन पुरवठा करण्यात येत आहे. रानतळोधी गावातील ग्राम परिस्थितीकीय विकास समितीने सूक्ष्म आराखडयात सहमती दर्शविली नसल्याने तसेच “कोळसा” या गावातून इंधनाच्या गॅससाठी प्रतिसाद नसल्याने या गावांत इंधनाच्या गॅसचा पुरवठा करण्यात आला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुण्यातील मुळा-मुठा कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(४०) * ७९७६ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील जुना मुळा-मुठा छोटया कालव्यात पाण्याचा विसर्ग सोडला जात नसल्याने व अतिक्रमणाकडे पाटबंधारे खात्याचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने या कालव्याला कचराकुंडीचे स्वरुप निर्माण होऊन दुर्दशा झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शेतजमिनींना पाणी उपलब्ध होण्यासाठी उपयुक्त असलेल्या कालव्याच्या पुनरुज्जीवनासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

खडकवासला प्रकल्पाच्या जुना मुठा उजव्या कालव्याचे बांधकाम सन १८८० मध्ये पूर्ण झाले असून सन १९६५ मध्ये नवीन मुठा उजव्या कालव्याचे बांधकाम होईपर्यंत जुना मुठा उजवा कालवा सिंचनासाठी वापरात होता. परंतु सन १९६५ पासून जुना मुठा उजवा कालवा वापरात नाही.

तद्नंतर पुणे शहराची वाढ झाल्यामुळे जुना मुठा उजवा कालव्याच्या संपादित जागेमधील काही भागामध्ये अतिक्रमण झालेले आहे. सदर अतिक्रमित भागामध्ये पुणे महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा व्यवस्था, सांडपाणी व मल निसा:रण व्यवस्था, दळणवळण व्यवस्था, सार्वजनिक दिवे या सर्व सुविधा पुरविण्यात आलेले आहेत.

जलसंपदा विभागाच्या अतिक्रमित भागामध्ये कचरापेटी ठेवणे अथवा नागरिकांनी टाकलेला कचरा काढणे ही जबाबदारी पुणे महानगरपालिकेची आहे. जुना मुठा उजव्या कालव्यातील कचरा/राडारोडा काढणेबाबत पुणे महानगरपालिकेस जलसंपदा विभागाने सन २००२ ते २०१४ या कालावधीत वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

महापालिका हद्दीतील भागामध्ये नागरिकांनी टाकलेला कचरा/राडारोडा उचलणे तसेच परिसर आरोग्यदायी ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी पुणे महानगरपालिकेची आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) महानगरपालिका मुळा-मुठा नदीतील ६.५० पुणे टिएमसी प्रक्रीया केलेल सांडपाणी जूना मुठा उजवा कालवा कि.मी. २८ मध्ये सिंचनासाठी उपलब्ध करुन देणार आहे. त्याअनुषंगाने पहिल्या टप्प्यामध्ये जुना मुठा उजवा कालवा कि.मी. २८ ते ८२ मधील कालवा पुनरुज्जीवनासाठीची आवश्यक कामे प्रगतीपथावर आहेत.
तद्‌नंतर दुसऱ्या टप्प्यामध्ये जुना मुठा उजवा कालवा कि.मी ८३ ते १११ व १९ ते २७ मधील कालवा पुनरुज्जीवनासाठीची आवश्यक कामे हाती घेण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात परिचारिकेवर केलेला अतिप्रसंग

**(४१) * ७६३४ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात रात्रपाळीवर असलेल्या एका परिचारीकेवर रुग्णांच्या तीन नातेवाईकांनी दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटना रात्री दीड वाजण्याच्या सुमारास घडली असताना रुग्णालय प्रशासनाने याबाबत पोलिसात तक्रार दाखल न करता सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार रुग्णालय प्रशासनावर व संबंधीत रुग्णांच्या दोषी नातेवाईकांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर घटनेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी दि. २०.०५.२०१५ रोजी सरकारवाडा पोलीस स्टेशन यांना लेखी कळविले आहे.

(३) व (४) निवासी वैदयकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) आणि अधिसेविका यांनी चौकशी केली. रुग्णांच्या नातेवाईकांबाबत पोलीसांना कळविण्यात आले आहे तसेच रुग्णालयाची सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

-----------------

## पूर्व हवेली तालुक्यात (जि.पुणे) येथे घरकुल वाटप योजनेंतर्गत झालेला गैरप्रकार

**(४२) * ८१२८ श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पूर्व हवेली तालुक्यात अनेक ग्रामपंचायत सदस्यांनी आपल्या नातेवाईकांना तसेच सदर व्यक्तींना घरकुल योजनेचा लाभ दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्व हवेली तालुक्यातील या घरकुल वाटप योजनेची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

पुणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या यशवंत घरकुल योजनेअंतर्गत ग्रामपंचायत हिंगणगाव येथे दि. १३.३.२०१५ रोजी प्राप्त झालेली आहे.

(२) चौकशी करण्यात आली आहे.

ग्रामपंचायत हिंगणगाव येथील १९ पात्र लाभार्थ्यांना जिल्हा परिषद स्वनिधीमधून राबविण्यात येत असलेल्या यशवंत घरकुल योजनेतून लाभ देण्यात आला आहे. त्यामध्ये ग्रामपंचायत सदस्यांनी पदाचा दुरुपयोग केल्याचे तसेच नातेवाईकांना घरकुलाचा लाभ दिल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हत्तींच्या कळपाने बागायती शेतीचे मोठया प्रमाणात केलेले नुकसान

**(४३) * ७७१७ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ३०३७ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी जंगलातील तीन हत्तींच्या कळपाने दोडामार्ग बाबरवाडी येथे शेती बागायतीचे मोठया प्रमाणात नुकसान केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील ग्रामस्थांनी स्थानिक वन विभागाकडे तक्रारी करुन सुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान दोडामार्ग वनपरिक्षेत्रातील हेवाळे गावाच्या बाबरवाडीत तीन हत्तीच्या कळपाने शेतीबागायतीचे नुकसान केल्याची १८ प्रकरणे निदर्शनास आली असून सदर नुकसान भरपाई पोटी रु. ७,१३,३६०/- नुकसानग्रस्त शेतकऱ्यास अदा करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हत्ती बाधीत क्षेत्रामध्ये कर्मचाऱ्यांमार्फत नियमित गस्त घालण्यात येऊन हत्तींना नैसर्गिक अधिवासात पाठविण्यात येते.

-----------------

## सावनेर येथील (जि.नागपूर) पाटणसावंगीमधील ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाबाबत

**(४४) * ८६८१ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर येथील (जि.नागपूर) पाटणसावंगीमधील ग्रामीण रुग्णालयासाठी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात निधी मंजूर करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी रुग्णालय बांधण्यासाठी माहे मार्च २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(३) असल्यास, सदर रुग्णालयाचे काम किती कालावीधत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०१५-२०१६ मध्ये रुपये ०.०१ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.
(३) सदर रुग्णालयाचे बांधकाम येत्या दोन वर्षात पूर्ण करण्याचे प्रयोजन आहे.
(४) हाती घेण्यात आलेली चालु बांधकामे प्राथम्याने पूर्ण करुन मग नविन कामे हाती घेण्याचे धोरण आहे.

-----------------

## जुन्नर व शिरुर तालुक्यात (जि.पुणे) ९ बिबटयांचा झालेला मृत्यू

**(४५) * ८८३३ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जुन्नर व शिरुर तालुक्यात (जि.पुणे) गेल्या सहा महिन्यात ९ बिबट्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बिबटयांच्या संवर्धनासाठी त्यांच्या संरक्षणाच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) पुणे जिल्ह्यातील जुन्नर वन विभागात माहे डिसेंबर, २०१४ पासून विहीरीमध्ये पडून - ५, नदीपात्रातील डोहात बुडून - १, रस्ता अपघातात - १ व वार्धक्यामुळे २ अशा प्रकारे एकूण ९ बिबटयांचा मृत्यू झाला आहे.

बिबटयांच्या संवर्धन व संरक्षणाच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

बिबटयाच्या नैसर्गिक भक्ष्य वाढीच्या अनुषंगाने वनाच्छादनात वाढ करण्याचे प्रयत्न करण्यात येतात.

विविध योजनांच्या माध्यमातून वनीकरणाची कामे करण्यात येतात.

कठडे नसलेल्या विहीरींना कठडे बांधण्याच्या अनुषंगाने जिल्हापरिषदेच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नंदुरबार जिल्हा परिषदेत वर्ग-१ व वर्ग-२ ची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) * ९०८८ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित स्वीकृत प्रश्न क्रमांक ४४७४ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हा परिषदेत वर्ग-१ व वर्ग-२ ची सुमारे ८० पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेची सुमारे ८० पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) या विभागाच्या अधीनस्त महाराष्ट्र विकास सेवेतील वर्ग-१ व वर्ग-२ ची ३ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे सरळसेवेने/पदोन्नतीने/बदलीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेकडील विविध योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम २३९ नुसार महाराष्ट्र विकास सेवा वगळून इतर वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत निर्माण करण्यात आली असून ती संबंधित प्रशासकीय विभागाकडून भरली जातात. इतर प्रशासकीय विभागांची ७८ पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेतील अधिका-यांची सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांना वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. दिनांक २०.६.२०१५ रोजी पुन्हा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हा परिषदेच्या विविध पदासाठी झालेल्या परिक्षांच्या प्रश्नपत्रिकांची विक्री झाल्याबाबत**

**(४७) * ९४५०  श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या विविध पदासाठी झालेल्या परिक्षांच्या प्रश्नपत्रिकांची विक्री झाल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पेपरफुटी प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) सदरची घटना दि. २८/४/२०१५ रोजी निदर्शनास आली नसून ती दि. २/११/२०१४ रोजी निदर्शनास आली आहे.

जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत भरती प्रक्रीयेसंबधित दि. २/११/२०१४ रोजी आयोजित परीक्षांच्या प्रश्नपत्रीकेच्या उत्तरतालीका आर्थिक गुन्हेशाखा औरंगाबाद यांनी जप्त केलेल्या असून तपासणी अंती १२. आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येवून त्यांचे पैकी ११ आरोपी विरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. एका आरोपीबाबत दोषारोप दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच तत्कालीन जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याचे दृष्टीने मागीतलेल्या परवानगीबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

या व्यतिरीक्त दि. २२/११/२०१४ रोजी झालेल्या परिचर पदाच्या परीक्षेदरम्यान, प्रश्नपत्रीका केंद्रावरील समवेक्षकामार्फत केंद्राबाहेर गेल्याचे निदर्शनास आले त्यानुसार सदरहू समवेक्षकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तसेच संबधित समवेक्षकास जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

दि. २/११/२०१४ व २२/११/२०१४ रोजी आयोजित केलेल्या परीक्ष रद्द करुन अनुक्रमे ३० नोव्हेंबर, २०१४ व ४ जानेवारी, २०१५ रोजी फेर परीक्षा घेण्यात आल्या आहेत.

-----------------

## दक्षिण सोलापूर तालुक्यातील (जि.सोलापूर) पाझर तलावाचे साठवणूक तलाव म्हणून विस्तार करण्याबाबत

**(४८) * ६९९९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) हा दुष्काळी तालुका असून या तालुक्यामध्ये सिंचनाच्या सुविधा अपु-या असल्यामुळे ओलिताखाली येणारे क्षेत्र अत्यंत कमी असल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील पाझर तलावाचे साठवणुक तलाव म्हणुन विस्तार करण्यात यावा असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पाटबंधारे मंत्री यांना दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे,

(२) कासेगाव येथील पाझर तलावाचे साठवण तलावात रुपांतर करण्यसाठी मा. मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांचेकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाले असून अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

गंगेवाडी पाझर तलावाचे साठवण तलावात रुपांतर करण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

दर्शनाळ पाझर तलावाचे पुरेसे पाणलोट क्षेत्र नसल्याने साठवण तलावात रुपांतर करता येत नाही.

उर्वरित पाझर तलावापैकी बोरामणी, मुस्ती, दर्गनहळ्ळी व होटगी पाझर तलावाचे साठवण तलावात रुपांतरासाठी तांत्रिक बाबींची व व्यवहार्यते बाबतची छाननी प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मंत्रिमंडळ पायाभूत समितीची स्थापना न झाल्याने**
**एम.एस.आर.डी.सी.ची कामे रखडल्याबाबत**

**(४९) * ६६७४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्गत प्रकल्प मंजूरी इत्यादीकरीता मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीचे गठण करणे आवश्यक असताना सहा महिन्याचा कालावधी उलटूनही अद्याप समिती गठीत करण्यात आली नसल्याचे दिनांक ११ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) एम.एस.आर.डी.सी. या विभागाचे कामकाज व इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रकल्प मंत्रिमंडळातील पायाभूत सुविधा समितीच्यामार्फत मंजूर केले जातात. परंतु मंत्रिमंडळ पायाभूत सुधार समिती गठीत न झाल्याने २५ कोटींपेक्षा अधिक रक्कमेच्या प्रकल्पाच्या कामांच्या निविदा काढणे, निविदा निश्चित करणे इ. कामे होत नाहीत. त्यामुळे राज्यात मोठमोठ्या प्रकल्पांच्या घोषणा केवळ कागदावरच राहिल्या आहेत हे, खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रिमंडळ पायाभूत समिती स्थापन न झाल्याने हा विभाग तोटयामध्ये चालला असल्याने या विभागातील कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी तसेच प्रकल्प पुर्ण करण्याच्यादृष्टीने समिती गठीत करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

पायाभूत सुविधांच्या विविध प्रकल्पांना मंजूरी देण्यासाठी पायाभूत सुविधा समिती पुर्नरचित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक ८ जुन, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीची पुर्नरचना करण्यात आली आहे.

(२) नाही.

पायाभूत सुविधा समिती समोर सादर करावयाचे कोणतेही प्रस्ताव नियोजन विभागाकडे प्रलंबित नाहीत.

(३) व (४) दिनांक ८ जुन, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीची पुर्नरचना करण्यात आली आहे.

-----------------

**अमरावती व वर्धा जिल्ह्यातील अपूर्ण राहिलेल्या धडक सिंचन विहिरींची कामे रोजगार हमी योजनेंतर्गत पूर्ण करण्याबाबत**

**(५०) * ६६९९ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३८६७ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील व वर्धा जिल्ह्यातील धडक सिंचन विहिर योजनेंतर्गत ३४३४ व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत १२२४१ विहिरींची बांधकामे अपूर्ण आहेत ती पूर्ण करण्यासाठी शासनस्तरावरुन विभाग व जिल्हानिहाय स्तरावर आतापर्यंत किती बैठका घेण्यात आल्या,

(२) असल्यास, शासनस्तरावरुन सुधारीत सूचना केव्हा निर्गमित करण्यात आल्या,

(३) असल्यास, शासनस्तरावरुन झालेल्या वरील कार्यवाहीनुसार माहे मे, २०१५ अखेर किती विहिरींची बांधकामे पूर्ण करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अमरावती विभागातील व वर्धा जिल्ह्यातील धडक सिंचन विहीर योजनेतील अपूर्ण विहीरींची कामे पूर्ण करण्यासंदर्भात शासनस्तरावरुन विभागीय स्तरावर तीन तर जिल्हास्तरावर दोन बैठका घेण्यात आल्या आहेत.

(२) सदर अपूर्ण विहीरी पूर्ण करण्यासाठी दिनांक ७ जानेवारी, २०१५, २६ फेब्रुवारी, २०१५, ७ मार्च, २०१५ व दिनांक ६ एप्रिल, २०१५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) धडक सिंचन विहीरीची १३६६ कामे तर धडक सिंचनामधून नरेगात वर्ग केलेल्या १८५३ विहीरींची कामे मे, २०१५ अखरे पूर्ण करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुंद्राळा मध्यम प्रकल्पांतर्गत (जि.नांदेड) कॅनॉल दुरुस्तीचे अपूर्ण असलेले काम**

**(५१) * ९१३४ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील कुंद्राळा मध्यम प्रकल्पांतर्गत चालू असलेल्या कॅनॉल दुरुस्तीचे काम अद्याप पूर्णही झालेले नसताना माहे एप्रिल, २०१५ मध्ये पडलेल्या पावसामुळे झालेल्या कामापैंकी बहुतांश ठिकाणी कॅनॉल फुटले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर कॅनॉलचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येईल ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर कामे सप्टेंबर २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**मेळघाट मधील हिराबंबई शेतशिवारात पट्टेदार वाघाची झालेली हत्या**

**(५२) * ७४२४ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट मधील हिराबंबई शेतशिवारात वनविभागाने टाकलेल्या धाडित पट्टेदार वाघाची निर्दयीपणे हत्या केल्याची गंभीर घटना दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडल्याची निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, वाघांच्या शिकारीला तसेच वन्यप्राण्यांचे संरक्षण संवर्धन करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) प्राप्त माहितीच्या अनुषंगाने धारणी तालुक्यातील मौजे, हिराबंबई गावात वन्यजीव व प्रादेशिक वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संयुक्तपणे धाड टाकून वन्यप्राण्यांचे अवयव उदा. होडे, कातडी, मांस, शिंगे, कवटी, तसेच चिमटा (Trap) इत्यादी जप्त करण्यात आले आहेत. सदरचे अवयव वाघाचे असल्याचे दिसून आले नाहीत. तथापि जप्त केलेले अवयव व साहित्य तपासणीसाठी WII (भारतीय वन्यजीव संस्था) देहरादून व CCMB (सेंटर फॉर सेल्यूलर अँड मॉलेक्यूलर बायोलॉजी) हैद्राबाद येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

उपरोक्त प्रकरणी तीन इसमांविरुध्द वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ९,४०,५१ (१-c) अन्वये दिनांक १९.०५.२०१५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर प्रकरणातील दोन इसम फरार असून त्यांच्या शोध घेणे चालू आहे.

(३) वाघांच्या शिकारीला आळा घालणे व वन्यप्राण्यांच्या संरक्षण, संवर्धन करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

सद्यस्थितीत ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व पेंच व्याघ्र प्रकल्पासाठी प्रत्येकी एक विशेष व्याघ्र संरक्षण दल कार्यरत असून मेळघाट व नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पासाठी प्रत्येकी एक विशेष व्याघ्र संरक्षण दल मंजूर करण्यात आले आहे.

वनविभागातील क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी यांच्या मार्फत वनक्षेत्रात जास्तीत जास्त गस्त करण्यात येते.

पाणवठयांची निगा राखली जाते.

अनोळखी इसमांची चौकशी केली जाते

वन्यजीव अधिवास विकासाची कामे घेतली जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## पुणे येथील येरवडया नदीजवळ असलेल्या डॉ.सलीम अली पक्षी अभयारण्यात होणारी वृक्षतोड

**(५३) * ७९४२ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील येरवडया नदीजवळ असलेल्या डॉ.सलीम अली पक्षी अभयारण्याची जबाबदारी घेण्यावरुन वन विभाग आणि पुणे महानगरपालिका टाळाटाळ करत असल्याने स्थानिक रहिवाशांकडून बेसुमार वृक्षतोड होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेसुमार वृक्षतोड होत असल्यामूळे तेथील जैवविविधता धोक्यात आली असून परिसराला वेळीच संरक्षण न दिल्यास या अभयारण्याला धोका निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

उपरोक्त ठिकाणी कोणतेही अभयारण्य नसल्याने सदर जागा वन विभागाचे ताब्यात नाही. सदरचे क्षेत्रात पालिकेचे कचरा डेपो व स्मशानभूमी असल्यामुळे सरपणासाठी किरकोळ झाडे व फांद्याची तोड झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापी सदर किरकोळ वृक्षतोडीमुळे सदर क्षेत्रास व तेथील जैवविविधतेस धोका पोहोचलेला नाही.

(३) सदरची जमीन वनक्षेत्र नसल्याने विभागास उचित कार्यवाही करणे शक्य झाले नाही. तथापी विभागामार्फत तेथील पक्षांचे अधिवास वाढविणे तथा संरक्षणासाठी एका वनमजूराची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र व गुजरात राज्य शासनाने नर्मदा व तापी नदी मधील पाणी वाटपाचा केलेला सामंजस्य करार

**(५४) * ८३५२ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित स्वीकृत प्रश्न क्रमांक २८०९ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र व गुजरात राज्य शासनाने नर्मदा व तापी नदी मधील पाणी वाटपाचा सामंजस्य करार केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या करारामुळे महाराष्ट्राच्या वाट्याचे १०.८९ पैकी तब्बल पाच टीएमसी पाणी गुजरातला देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नंदुरबार जिल्हयातील सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन क्षेत्रात १० टीएमसी पाणी वापरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) नाही.

नर्मदा पाणी वाटप लवादानुसार नर्मदा खोऱ्यात महाराष्ट्रास १०.८९ अघफू पाणी वाटपाचे अधिकार आहेत. तथापि नर्मदा खोऱ्यातील प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे आतापर्यंत सदर पाण्याचा वापर करणे शक्य झालेला नाही. तसेच नर्मदा खोऱ्यात भौगोलिक प्रतिकूल परिस्थितीमुळे व्यवहार्य सिंचन प्रकल्प शक्य नसल्याचे निदर्शनास आलेने उकाई धरणातून ५ अ.घ.फू पाणी मिळणेबाबतची विनंती गुजरात शासनास मुख्यमंत्री स्तरावरील बैठकीत दि. २३.८.२००२ रोजी करण्यात आली होती. सदर विनंती गुजरात शासनाने मार्च, २००६ मध्ये सरदार सरोवर प्रकल्पाच्या महाराष्ट्राच्या हिश्यात तितक्याच पाण्याची कपात करण्याच्या अटीवर मान्य केली. याबाबतचा सामंजस्य कराराच्या मसुद्यास सप्टेंबर, २०१४ मध्ये उभय राज्यांची सहमती झाली.

त्यानुसार दि. ७.०१.२०१५ रोजी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.

सदर करार हा नर्मदा खोऱ्यातील प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती तसेच तापी खोऱ्यातील पाण्याची तुट विचारात घेऊन केला असून तो शासनाच्या हिताचा आहे.

(३) नर्मदा जल लवाद आयोग निवाडयानुसार महाराष्ट्राच्या वाटयास आलेल्या १०.८९ अघफू पाण्यापैकी नर्मदा खोऱ्यातील ५.५९ अघफू पाणी तापी खोऱ्यात वळविणे या प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षणाच्या रु.६,४२,४९६००/- किंमतीच्या अंदाजपत्रकास दि. १३.०१.२००९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षणाच्या रु. १२,९१,१९५००/- किंमतीच्या अंदाजपत्रकास दि. ०९.०८.२०११ चे शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अधिक लोकाभिमुख होण्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(५५) * ८०४७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अधिक लोकाभिमुख होण्यासाठी या योजनेची व्याप्ती वाढविण्याची तसेच अन्य काही सुचनांवर शासनाने विचार करण्याची लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर विभागातील अर्नेजा हर्ट इन्स्टिटयुटसह काही खाजगी रुग्णालयांची दोन वर्षा पासून ८ कोटी रुपयांची देयके शासनाने न दिल्यामुळे सदर खाजगी रुग्णालयांनी उक्त योजनेच्या शस्त्रक्रिया करण्यास नकार दिल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील थकीत देयकांबाबत नागपुरच्या आरोग्य उपसंचालक कार्यालयाने आरोग्य सेवा संचालनालयास वेळोवेळी स्मरणपत्रे पाठविलेली आहेत, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) अर्नेजा हार्ट इन्स्टीटयुटसह नागपुर परिमंडळातील रुग्णालयांची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत केलेल्या उपचारांची थकबाकी प्रलंबित नसुन जुन्या जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट रुग्णालयांची मार्च, २०१४ अखेर रुपये १२.१३ कोटी एवढी थकबाकी प्रलंबित होती. त्यापैकी जून, २०१५ अखेर रुपये ७.२७ कोटी एवढी रक्कम मंजुर करण्यात आली असुन आज दिनांकास नागपूर परिमंडळातील रुग्णालयांची रुपये ४.८६ कोटी एवढया रक्कमेची देयके प्रलंबित आहेत. त्यामध्ये अर्नेजा हार्ट इन्स्टीटयुट या रुग्णालयाच्या रुपये १५.२९ लाख एवढया प्रलंबित देयकांचा समावेश आहे.

राज्यात जुनी जीवनदायी आरोग्य योजना दिनांक २१.११.२०१३ पासून बंद झाली असुन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत नागपुर परिमंडळातील रुग्णालयांनी पैसे अदा न केल्यामुळे उपचारास नकार दिल्याची तक्रार प्राप्त नाही.

(३) होय.

(४) जीवनदायी आरोग्य योजनेतंर्गत उपलब्ध तरतुद विचारात घेऊन सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात रुपये ३०८० लक्ष व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात जून २०१५ अखेर रुपये १९७५.६८ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. उर्वरित प्रलंबित देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगांव (जि.बुलडाणा) परिसरातील जलसंधारणाची कामे मंजुर करण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत

**(५६) * ८१४२ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०४७ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) परिसरातील जलसंधारणाची कामे मंजुर करण्याबाबत VIIDP च्या DPR-४ च्या निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर VIIDP च्या DPR-४ च्या प्रस्तावाला तात्काळ मंजुरात देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) DPR-४ शासनास प्राप्त आहे.

(२) या कार्यक्रमांतर्गत लघु सिंचन (जलसंधारण) अंतर्गत आतापर्यंत ५९६२ योजनांच्या रु. ९३३.१९ कोटी किंमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) शासनाने मुंजूरी दिली आहे. या कार्यक्रमांतर्गत निर्मिती दायित्व व केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने पुढील सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मंजूरीची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य महिला आयोगाची कार्यालये स्थापन करण्याबाबत**

**(५७) * ६७४३ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महिला आयोगाने राज्यात प्रत्येक महसूली विभाग स्तरावर राज्य महिला आयोगाची कार्यालये स्थापन करण्याची शिफारस ४/५ वर्षापूर्वी राज्य शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिफारशींवर अद्यापी अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) वरील शिफारशींची राज्यात अंमलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय

(२) व (३) सदर प्रस्ताव सन २०११ मध्ये सादर करण्यात आला होता. तथापि, राज्यातील महिलांच्या समस्यांसाठी विविध कायदे करण्यात आलेले असून या कायद्यांमधील तरतूदींचा महिलांना लाभ व्हावा यासाठी राज्यातील पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. प्रोटेक्शन ऑफीसर नेमण्यात आलेले आहेत. नवीन कोर्ट (फास्ट ट्रॅक) उभारण्यात आली आहेत. महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी विविध सेवाभावी संस्थाही कार्यरत आहेत. याबाबत वित्त विभागाकडून उपस्थित मुद्यांबाबत अधिक माहिती आयोगाकडून मागविण्यात आली आहे.

-----------------

**प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी इसीजी मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५८) * ९२१५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अ, ब व क वर्गातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी हृदय विकारासारख्या गंभीर आजाराचे निदान त्वरीत व्हावे यासाठी सर्व आरोग्य केंद्रावर इसीजी (इलेक्ट्रो कार्डीओग्राफी) मशीन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी सदर मशीन उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टिने राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राना राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत टप्याटप्याने ईसीजी मशीन सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

त्यानुसार ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रांना ईसीजी मशीन खरेदी करण्याकरीता सन २०१५-१६ च्या राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रम अंमलबजावणी आराखडयामध्ये (पीआयपी) अनुदान प्रस्तावित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाकडून पीआयपी मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ईसीजी मशीन उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हयात रानडुक्कर व हरीण या प्राण्यांच्या उपद्रवामुळे पिकांचे व शेतीचे नुकसान झाल्याबाबत**

**(५९) * ७४८१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात रानडुक्कर व हरीण यासारख्या वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे पिकांचे व शेतीचे मोठे नुकसान होत असल्याच्या तक्रारी शेतकरी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय किसान संघाचे महामंत्री यांनी याबाबत दिनांक १६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे याबाबत तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोशीकीय एवं अन्विक जीव विज्ञान केंद्र, हैद्राबाद यांनी दिनांक १५ मे, २०१४ अन्वये बीड जिल्हयात पिक नुकसान करणारे प्राणी रानडुक्कर नसून पाळीव डुक्कर असल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वनविभागाने उक्त संस्थेकडे दिलेल्या जैविक नमुन्याचे फेर सर्व्हेक्षण करण्याचे आदेश मा. वने मंत्री यांनी दिल्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच बीड जिल्हयात रानडुक्करांकडून शेतकऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्यातील जखमींना मदत देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.
(४) गेवराई तालुक्यातील ४ गावांचे शेतातील डुक्करांचे रक्त, मांसाचे नमुने फेरतपासणीकरता हैद्राबाद येथील कोशकिय संस्थेस पाठविले असता सदर डुक्कर हे रानडुक्कर असल्याचे दिनांक २४.०६.२०१५ च्या अहवालात नमूद केले आहे.
(५) रानडुक्करांच्या हल्ल्यात जखमी/मृत पावणाऱ्या शेतकऱ्याच्या कायदेशीर वारसास दिनांक ०२.०७.२०१० च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दिनांक ०४.०७.२०१४ पर्यंत नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) येथे कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू

**(६०) * ७२१० श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ४१४६ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू तसेच कुपोषित मातांमुळे होणारे अर्भक मृत्यू सुरुच असून सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ० ते ६ वर्षे वयोगटातील ३४४ अर्भक बालकांचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेळघाटातील पाड्यात बालरोगतज्ञ आणि स्त्रीरोग तज्ञ उपलब्ध नसल्याने गर्भवती महिला आणि जन्मलेल्या बालकांना वेळीच उपचार व औषधे मिळत नाहीत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, येथे कुपोषणामुळे होणारे अर्भक मृत्यू बालमृत्यू रोखण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात ० ते ६ वर्ष वयोगटातील ३४४ बालकांचे विविध आजाराने मृत्यू झालेले आहेत.

(२) हे खरे नाही. मेळघाट परीसरातील बालमृत्यू व अर्भकमृत्यू हे कमी वजनाचे बालक हे प्रामख्याने कमी वजन, अस्पेक्झीया, न्युमोनिया, जन्मत: व्यंग व इतर आजारांमुळे झाले असल्याचे आढळून आले आहे. उपजिल्हा रुग्णालय धारणी येथी स्त्रीरोग तज्ञ व बालरोग तज्ञ उपलब्ध असून त्याठिकाणी तज्ञामार्फत वैद्‌यकीय उपचार करण्यात येतात. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर व ग्रामस्तरावर भेटी दरम्यान वैद्‌यकीय अधिकारी बालकांना आणि गर्भवती मातांना वैद्‌यकीय उपचार देतात.

(३) बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी व कुपोषणाला आळा घालण्यासाठी शासनाकडून पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येते.

१) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम

२) जननी सुरक्षा योजना

३) भरारी पथक योजना

४) मातृत्व अनुदान योजना

५) ग्राम बाल विकास केंद्र (VCDC)

६) बाल उपचार केंद्र (CTC)

७) पोषण पुनर्वसन केंद्र (NRC)

८) जिवनसत्व  अ व जंतनाशक मोहिम

९) आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष

१०) नियमित लसीकरण योजना

११) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम

१२) माता आरोग्य कार्यक्रमामध्ये गरोदर मातांची नोंदणी केली जाते. तसेच त्यांची तपासणी केली जाते व धनुर्वाताचे इंजेक्शन व लोहयुक्त गोळया दिल्या जातात.

१३) त्याचबरोबर जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर मातांना प्रसूतीपूर्वी, प्रसूतीदरम्यान व प्रसूतीपश्चात आणि ० ते १ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत सेवा देण्यात येतात यामध्ये लाभार्थ्यांना घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत तसेच संस्थेतून परत घरी मोफत वाहतूक सुविधा देण्यात येते. आरोग्य संस्थेमध्ये दाखल झाल्यावर मोफत आहार, मोफत रोगनिदान, मोफत औषधे व उपचार करणे इत्यादी सुविधा देण्यात येतात.

१४) जननी सुरक्षा योजनेअंतर्गत आरोग्य संस्थेत प्रसुतीच्या प्रमाणात वाढ होण्यासाठी राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील गर्भवती मातांना प्रसुतीपश्चात आर्थिक लाभ देण्यात येतो.

तसेच YCDC/CTC द्‌वारे कुपोषित बालकांना आवश्यक सुविधा व उपचार पुरविण्यात येऊन कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवनी क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषण मुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केसुर्ली ग्रामपंचायत अंतर्गत (ता.वणी, जि.यवतमाळ) दलित वस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(६१) * ७६०४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केसुर्ली ग्रामपंचायत अंतर्गत (ता.वणी, जि.यवतमाळ) दलित वस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामसेवक व अभियंता यांनी संगनमताने रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत**

**(६२) * ७३८३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील २४५९.३४ हेक्टर जमिनींचे अद्याप भूसंपादन केले नसल्याने अनुशेष यादीतील १२ सिंचन प्रकल्प रखडले असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील अनेक प्रकल्पांना एकतर सुधारित प्रशासकिय मान्यता मिळाली नसल्याने या प्रकल्पांच्या कामासाठी आलेला निधी पाटबंधारे विभागाला खर्च करता आला नाही आणि जमिनीचे अधिग्रहणही झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामध्ये काटेपूर्णा, कवठा, घुंगशी व उमा या मोठ्या बॅरेजचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अकोला, जिल्ह्यातील एकूण १२ सिंचन प्रकल्पापैकी १० प्रकल्पाकरीता भुसंपादन प्रक्रीया विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर आहे. दोन प्रकल्पकामे पूर्ण झाली आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

सुकळी प्रकल्पास सुप्रमा प्राप्त आहे. उमा बॅरेज, पूर्णा बॅरेज-२, नया अंदुरा, कवठा बॅरेज या बॅरेजेसना सुप्रमाची आवश्यकता नाही. पोपटखेड टप्पा-२, काटेपूर्णा, घुंगशी, वाई, शहापूर, कवठा शेलू या प्रकल्पांच्या सुप्रमांवर विविध स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच प्रकल्पाचे कामास एकूण ३०६६.५१ हे. संपादीत करावयाचे खाजगी जमिनीपैकी १४४८.३५ हे.संपादीत करण्यात आले असून, उर्वरित १६१८.१६ हे.जमिन संपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) होय.

(४) भूसंपादन प्रक्रीया व सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावांचे कामकाज विविध टप्प्यांवर प्राधान्याने प्रगतीपथावर असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) अकोला जिल्ह्यातील एकूण १२ प्रकल्पांपैकी हिवरा व सुकळी या २ संग्राहक प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित १० प्रकल्पांकरीता सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात एकूण रुपये ३१९.४१२० कोटीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. भूसंपादन अडचणी सोडवून प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम आखलेला आहे. त्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) येथे मनरेगा योजनेतंर्गत कामात झालेला गैरव्यवहार**

**(६३) * ६९७४ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनंत गाडगीळ, श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) येथे मनरेगा अंतर्गत कृषी, वन, सार्वजनिक बांधकाम विभाग इ खात्यांमार्फत या तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत २ वर्षात ६ कोटी रुपयांपेक्षा जास्त कामे बोगस मस्टरद्वारे पूर्ण झाल्याचे दाखवून निधी हडप केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पालघर जिल्ह्यातील डहाणू, विक्रमगड, जव्हारच्या आदिवासी बहुल भागात मनरेगा योजनेंतर्गत चर खोदणे, बुरुज, बांधबंदिस्ती, स्मशानभूमी, नर्सरी उभारण्याचे कामांमध्ये बोगस मस्टरद्वारे काम पूर्ण झाल्याचे दाखवून गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जव्हार (जि.पालघर) तालुक्यामध्ये सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षातील कामांच्या सामाजिक अंकेक्षण प्रक्रीयेदरम्यान झालेल्या जनसुनावणीमध्ये रु.३५,९३,९२१/- इतक्या रक्कमेच्या कामांबाबत अपहार झाल्याचा अहवाल सामाजिक अंकेक्षण पथकाने जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे सादर केला आहे.

तथापि डहाणू व विक्रमगड (जि.पालघर) या तालुक्यांमध्ये अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) होय.

प्रस्तूत प्रकरणी तहसिलदार जव्हार व गटविकास अधिकारी, पंचायत समिती जव्हार यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) या प्रकरणी सकृतदर्शनी दोषी आढळून आलेले अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

(अ) संबधित ३ ग्राम रोजगार सेवक यांचेवर पोलीस स्टेशन जव्हार येथे दि. १६.०५.२०१५ रोजी गुन्हा रजि. क्र. १-४०/२०१५ व क्र. १-४१/२०१५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(ब) पोष्टमन, साकुर, ता.जव्हार यांचे विरुध्द फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिले आहेत.

(क) संबंधित शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सेवेतुन निलंबित करण्यात आले आहे.

(ड) १ कृषी सहाय्यक यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच १ वनरक्षक व १ वनपाल यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. या चौकशीमध्ये दोषी आढळून आल्यास त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल.

(ई) गट विकास अधिकारी, पंचायत समिती जव्हार यांना विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुर्गम भागांमध्ये राज्यशासनाच्या सुरक्षित मातृत्वाच्या विविध योजना राबविण्याबाबत

**(६४) * ६९१४ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरक्षित मातृत्वाखाली राज्य शासनाच्या विविध योजना आहेत, तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु आहे परंतु राज्यातील दुर्गम भाग, तांडे, आदिवासी पाडे तसेच झोपडपट्‌यामध्ये दळणवळणाचे साधने नसल्याने घरी होणाऱ्या प्रसूतीचे प्रमाण १२ टक्के आहे, याशिवाय बाळंतपणात दरवर्षी १४०० मातांचा मत्यू होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरी होणारी प्रसूती तसेच प्रसूती दरम्यान होणारे माता मृत्यू टाळण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यामध्ये सन २०१४-१५ या वर्षात घरी प्रसुती होण्याचे प्रमाण २ टक्के आहे. तसेच माता मृत्यूची संख्या १४४६ इतकी आहे.

(२) घरी होणारी प्रसूती तसेच प्रसूती दरम्यान होणाऱ्या माता मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनामार्फत खालील विविध आरोग्य सेवा देण्यात येतात.

गरोदर माता नोंदणी, लोहयुक्त गोळया वाटप, धनुर्वात प्रतिबंधक लसीकरण, जोखमीच्या अवस्थेबाबत तपासणी व समुपदेशन तज्ञांकडून तपासणी तीव्र रक्त क्षयासाठी शिरेतून इंजेक्शन आयर्न सुकरोज, गर्भवती मातेची त्वरीत नोंदणी करणे, रक्त लघवी, रक्तदाब, पोटावरुन तपासणी करणे, गरोदरपणाच्या दुसऱ्या तीमाहिमध्ये जंतनाशक गोळया दिल्या जातात तसेच कॅलशियमयुक्त गोळया दिल्या जातात.

**जननी सुरक्षा योजनेंतर्गत** अनुसूचित जाती/जमाती, दारिद्रय रेषेखालील गर्भवती मातांना शासकीय व शासनमानांकित संस्थेतील प्रसूतीसाठी ग्रामीण भागातील महिलेस रु. ७०० व शहरी भागातील महिलेस रु. ६०० असा लाभ देण्यात येतो.

- दारिद्रय रेषेखालील महिलेची घरी प्रसुती झाल्यास रु. ५००/- लाभ देण्यात येतो.
- पात्र लाभार्थीची जोखमीची शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्यास रु. १५०० पर्यंतचा लाभ दिला जातो.
- मातांना व १ वर्षापर्यंतच्या आजारी बालकांना मोफत उपचार देणे, रुग्णवाहिकेचा लाभ देणे, तपासण्या व जेवण यासारख्या बाबी पुरवणे व आवश्यकता वाटल्यास मोफत रक्त पुरवठा करणे.

**नवसंजीवनी योजनेंतर्गत** मातृत्व अनुदान योजना राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत मातांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी व त्यांना सुयोग्य आहार वेळेत उपलब्ध व्हावा याकरिता सन १९९७-९८ पासून १६ आदिवासी जिल्हयात ही योजना शासनाने मंजुर केलेली आहे. त्याअंतर्गत गरोदरपणामध्ये रु. ४०० रोखीने व ४०० रुपयांची औषधे याप्रमाणे प्रत्येक लाभार्थीला एकूण ८०० रुपयाचा लाभ देण्यात येतो.

महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत मानवविकास कार्यक्रम २२ जिल्हयांतील १२५ तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत तज्ञ महिला डॉक्टरांकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी, ० ते ६ महिने बालक असलेल्या स्तनदामाता तसेच २ वर्ष वयाच्या बालकांची तपासणी करणे, औषधोपचार करणे इ. उपाययोजना करण्यात येतात. तसेच अनुसूचित जाती जमाती व दारिद्रय रेषेखालील गरोदर महिलेला बुडीत मजुरीपोटी रु. ४,००० इतकी रक्कम ७ ते ९ व्या महिन्यात देण्यात येते. किशोरवयीन मुलींना १२ ते १८ वर्ष पौंगडांवस्थेतील आरोग्य व जीवन कौशल्य विकसित करण्याबद्दल प्रशिक्षित करण्यात येते.

- गरोदर मातांना आरोग्य सेवा या ग्राम पातळीपासून जिल्हापातळी पर्यंत दिल्या जातात त्याकरिता ग्रामपातळीवर आशा कार्यकर्ती, आरोग्य सेवीका, आरोग्य संस्थामध्ये वैद्यकीय अधिकारी स्त्रिरोगतज्ञ, भुलतज्ञ, परिचारीका इत्यादी अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

- वैद्यकिय अधिकारी व आरोग्य सेविका यांना सुरक्षित प्रसुतीचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच पुढील काळात विदर्भात जादा रक्तपेढया, रक्त साठवण केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय इ. आरोग्य संस्था नव्यने प्रस्तवित करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जिल्हा परिषद वाशिम येथील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या उपदानाबाबतची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(६५) * ७५६५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद वाशिम येथील अर्थ विभागात सेवाविषयक उपदानाबाबतची अनेक प्रकरणे गेल्या १० महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित प्रकरणांपैकी बऱ्याच प्रकरणांची पूर्तता झालेली असतानादेखील तेथील मुख्य लेखा व वित्त अधिकारी (श्री.हिवाळे) हे जाणून बुजून प्रकरणे निकाली काढण्यास टाळाटाळ करीत असल्याचे व या प्रकरणामध्ये मयत श्री.एम.डी.साखरे, विशेष शिक्षक कर्णबधीर शासकीय अपंग केंद्र, वाशिम यांचे निलंबन कालावधीमधील निर्वाह भत्त्याचे देयक मागील ८ ते ९ महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मयत श्री.साखरे यांचे सेवापुस्तकाची पडताळणी झालेली असताना देखील त्यांचे प्रकरणी पडताळणी झाली नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम यांचेकडे सादर केलेल्या नस्तीमध्ये चुकीचे नमूद करुन मुख्य लेखा वित्त अधिकारी (श्री.हिवाळे) यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम यांची दिशाभूल केल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गेल्या १० महिन्यांपासून संबंधित मयत कर्मचारी श्री.एम.डी. साखरे व इतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित उपदान अदायगी प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी व अन्य कर्मचारी यांचे विरुध्द शासनाने कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही. मागील १० महिन्यात प्राप्त झालेली जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सर्व म्हणजे ७८ प्रकरणे निकाली काढली आहेत.

(२) व (३) नाही. आयुक्त, अपंग कल्याण यांनी मयत शासकीय कर्मचारी साखरे यांच्या वेतन व भत्त्याबाबत निर्गमित केलेल्या आदेशानुसार सेवापुस्तकाची पडताळणी योग्य पध्दतीने झाली नसल्याची बाब मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वाशिम यांच्या निदर्शनास आणली आहे.

श्री.साखरे यांच्या सेवापुस्तकाबाबतच्या त्रुटींची पूर्तता करुन दिनांक ८/१२/१९९० ते २/१०/२००३ या कालावधीतील वेतन व भत्त्याच्या फरकाच्या रुपये ७,५२,२००५/- एवढया रकमेच्या प्रदानास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम यांनी दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी मंजूरी दिलेली असून सदरहू धनादेश मयत श्री.साखरे यांच्या वारसांचे बँक खात्यात जमा करण्यात आला आहे.

(४) व (५) जिल्हा परिषद, वित्त विभाग, वाशिम यांचेकडे उपदानाचे एकही प्रकरण प्रलंबित नाही. महालेखापाल, नागपूर यांनी मयत साखरे यांच्या रु. १,४२,०८०/- एवढया उपदानाच्या रकमेस मंजूरी प्रदान केल्यानंतर सदरहू उपदानाची रक्कम समाजकल्याण अधिकारी यांनी दि. २० मार्च, २०१५ रोजी श्री.साखरे यांच्या वारसदारांना अदा केलेली आहे.

-----------------

## खुलताबाद तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रद्द झालेल्या विहिरींचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(६६) * ७२२३ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१० मध्ये विविध गावातील ६९ विहीरी मंजूर करण्यात आल्या होत्या परंतू अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष, कर्मचाऱ्यांचा वेळकाढूपणा यामुळे मंजूर ३२ विहिरीचे प्रस्ताव रद्द करण्यात आलेले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब लाभार्थी शेतकऱ्यांच्या रद्द झालेल्या विहिरींचे प्रस्ताव पुन्हा मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, महात्मा गांधी नरेगा योजनेअंतर्गत सन २०११-२०१२ या वर्षामध्ये खुलताबाद तालुक्यात गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद यांनी वैयक्तिक लाभाच्या ६९ सिंचन विहिरी मंजूर केलेल्या आहेत. त्यापैकी आजमितीस ३४ विहिरी पूर्ण झालेल्या असून ३ विहिरी प्रगतीपथावर आहेत. शासन परिपत्रक दिनांक ७ मार्च, २०१५ नुसार नरेगा अंतर्गत दिनांक १ ऑगस्ट, २०१२ पूर्वीच्या मंजूर झालेल्या परंतु सुरु न झालेल्या विहिरी रद्द करण्याच्या अटीमुळे या ३२ विहिरी रद्द झालेल्या आहेत.

(२) रद्द झालेल्या विहिरींचे लाभार्थी महात्मा गांधी नरेगा योजनेअंतर्गत पुन्हा अर्ज करु शकतात व पात्रतेनुसार त्यांना लाभ देण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील एकात्मिक बालविकास योजना राबवूनही बाल व मातामृत्यू झाल्याबाबत**

**(६७) * ८३३१ श्री.अनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यामध्ये एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत लहान मुले, स्तनदामाता यांच्यासाठी सन २०१३-१४ मध्ये जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना कार्यान्वित असून देखील ३४२ बालमृत्यु व ३७ मातामृत्यु झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालमृत्यु व मातामृत्यूचे प्रमाण वाढण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, सदर प्रमाण कमी करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशतः खरे आहे.

सन २०१३-२०१४ मध्ये एकुण ५५५ बालमृत्यू व २८ मातामृत्यू झाले असल्याचे आढळून आले आहे.

(२) होय. सन २०१२-२०१३ मध्ये रायगड जिल्ह्यातील ० ते ५ वर्ष वयोगटातील ६६७ बालमृत्यूच्या प्रमाणात घट होऊन ते सन २०१३-२०१४ मध्ये ५५५ वर आले आहे. तसेच मातामृत्यूच्या प्रमाणात घट होऊन ते सन २०१३-२०१४ मधील ३२ वरुन सन २०१४-२०१५ मध्ये २८ वर आले आहे. उपरोक्त ५५५ बालमृत्यूपैकी ४४८ अर्भकमृत्यू हे ० ते १ वर्ष वयोगटातील आणि १०७ बालमृत्यू १ ते ५ वर्षे वयोगटातील असून सदर बालमृत्यू हे विशेषतः कमी वजन, अस्पेक्झीया, न्युमोनिया, जन्मतः व्यंग या आजारामुळे झालेले आहेत. तसेच २८ मातामृत्यू हे प्रामुख्याने पीपीएच, सेप्टीमिया, पल्मनरी एम्बोलिसम या आजारांमुळे झाले आहेत.

(३) बालमृत्यूचे व मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी पुढील कार्यक्रमांमार्फत उपाययोजना करण्यात येते.

१) जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम

२) जननी सुरक्षा योजना

३) भरारी पथक योजना

४) मातृत्व अनुदान योजना

५) ग्राम बाल विकास केंद्र (VCDC)

६) बाल उपचार केंद्र (CTC)

७) पोषण पुनर्वसन केंद्र (NRC)

८) जिवनसत्व अ व जंतनाशक मोहिम

९) आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष

१०) नियमित लसीकरण योजना

११) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम

१२) माता आरोग्य कार्यक्रमामध्ये गरोदर मातांची नोंदणी केली जाते. तसेच त्यांची तपासणी केली जाते व धनुर्वाताचे इंजेक्शन्स व लोहयुक्त गोळ्या दिल्या जातात.

१३) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर मातांना प्रसूतीपूर्वी, प्रसूतीदरम्यान व प्रसूतीपक्षात आणि ० ते १ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत सेवा देण्यात येतात. यामध्ये लाभार्थ्यांना घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत तसेच संस्थेतून परत घरी मोफत वाहतूक सुविधा देण्यात येते. आरोग्य संस्थेमध्ये दाखल झाल्यावर मोफत आहार, मोफत रोगनिदान, मोफत औषधे व उपचार करणे इत्यादी सुविधा देण्यात येतात.

१४) जननी सुरक्षा योजनेअंतर्गत आरोग्य संस्थेत प्रसुतीच्या प्रमाणात वाढ होण्यासाठी राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील गर्भवती मातांना प्रसुतीपश्चात आर्थिक लाभ देण्यात येतो.

१५) बालमृत्यू अन्वेषण व माता मृत्यू अन्वेषण

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील दहा एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाड्यांना पुरविण्यात येणाऱ्या पूरक आहार पुरवठ्यावरील स्थगितीबाबत**

**(६८) * ७१६३ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दहा एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या अंगणवाडयांना पूरक आहार पुरवठयावरील स्थगिती उठली असली तरीही बेलापूर कार्यालयातील अधिकारी आदेश देण्याचे टाळाटाळ करीत असल्याचे दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती बेलापूर कार्यालयातील अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

THR उत्पादन तपासणी करणेसाठी समिती गठीत करण्यात आलेली असून सर्व THR उत्पादन केंद्राची तपासणी करण्याबाबत दि. १०/०३/२०१५ च्या पत्रान्वये शासनाने निर्देश दिलेले आहे. त्यानुसार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी त्यांच्या दि. १३/०४/२०१५ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय आहार समिती यांना तालुकानिहाय THR उत्पादन केंद्राची समिती स्थापन करुन सदर THR उत्पादन केंद्राची तपासणी करुन जिल्ह्याच्या पूर्ण संकलित अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

जिल्हास्तरावरुन एकूण २३ जिल्ह्यांचे तपासणी अहवाल प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये ठाणे जिल्ह्याच्या समावेश आहे. आयुक्तांकडून प्राप्त झालेला तपासणी अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर तालुक्यातील पांगरे बुद्रुक, चिंचवाडी धरण प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(६९) * ७६४६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातील पांगरे बुद्रुक, चिंचवाडी धरणाचे काम चार वर्षापूर्वी पूर्ण होवूनही धरणाच्या पाण्याचा विनियोग करण्यात आलेला नाही तसेच प्रकल्पाग्रस्तांना एस आर ९३ नुसार देण्यात येणारी रक्कमही गेल्या चार वर्षापासून दिली नसल्याचे माहे मे, २०१५ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या जमिनीचा निवाडा दाखवत सुमारे १६ लाख ५० हजार रुपये संबंधित विभागाकडे वर्ग केले असतानाही संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे उक्त रक्कम संबंधितांना वितरीत करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

चिंचवाडी धरणातील पाणीसाठा पूर्ण झाला असून बंदिस्त नलिकेतून पथदर्शी वितरण प्रणाली बाबतची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने पाण्याचा विनियोग होऊ शकला नाही.

एस आर ९३ साठीची आवश्यक रक्कम माहे नोव्हेंबर २०१२ मध्ये महसूल विभागास वर्ग केलेली असून भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यामुळे जमिनीचा मोबदला वाटप करण्यात आलेला नाही.

(२) मोबदल्याची रक्कम ही महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी, राजापूर यांजकडे जमा आहे, तथापि, भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यामुळे जमिनीचा मोबदला वाटप करण्यात आलेला नाही.

(३) व (४) सन २०१३ च्या नवीन कायदयानुसार कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांची**
**नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत**

**(७०) * ९१०७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतिश चव्हाण, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे : तारांकित स्वीकृत प्रश्न क्रमांक ३६८२ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत असलेली प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण, जिल्हा व उपजिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या १८८१ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती प्रक्रिया अठरा महिने झाले तरी रखडली असल्याचे दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या भरती प्रक्रियेचे काम पुण्यातील ज्या संस्थेला देण्यात आले होते त्या संस्थेने भरती प्रक्रियेत मोठया प्रमाणात गोंधळ घातल्याने भरती व नियुक्ती प्रक्रियेस विलंब झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच आदिवासी भागात चांगल्या सुविधा मिळत नसल्यामुळे डॉक्टर जाण्यास तयार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व डॉक्टरांनी आदिवासी भागात जाऊन काम करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील १८८१ रिक्त पदे भरण्याबाबत स्वतंत्र निवड मंडळामार्फत जाहिरात देण्यात आली होती. त्याअनुषंगाने माहे एप्रिल, २०१४ ते माहे मे, २०१५ या कालावधीत एकूण १४५० वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली आहे. त्यापैकी १२०८ वैद्यकीय अधिकारी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाले आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

आदिवासी भागात काम करणाऱ्या इच्छूक असणाऱ्या उमेदवारांनी तसा पसंतीक्रम दर्शविल्यास त्यांना निवड प्रक्रियेत २० गुण वाढीव देण्यात आले होते. तसेच सेवा अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता आदिवासी भागात सेवा केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना अतिरिक्त गुण देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तापी-बुराई योजने अंतर्गत ठाणेपाडा प्रकल्प नं.२ (एम.आय.टँक) या धरणात पाणी सोडण्याबाबत

**(७१) * ९०९१ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार शहराचा पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी तापी-बुराई योजने अंतर्गत ठाणेपाडा प्रकल्प नं.२ (एम.आय.टँक) या धरणात पाणी सोडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान बैठक लावण्याबाबत मा.जलसंपदा मंत्री, यांना निवेदनाद्‌वारे विनंती करण्यात येऊनही अद्यापी बैठक लावण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विषयाबाबत त्वरीत निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी मा.मंत्री (जलसंपदा) यांना दिलेले निवेदन हे तापी-बुराई उपसा योजना (प्रकल्पजोड) कामास गती देण्याबाबतचे असुन, दिनांक २४/३/२०१५ च्या शासन पत्रान्वये आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचना महामंडळास निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) विषयांकित प्रकरणी, दिनांक १ जून, २०१५ चे निवेदन विचारात घेता, प्रकाशा-बुराई उपसा सिंचन योजनेच्या मंजुर प्रकल्प अहवालातील जलनियोजनात ठाणेपाडा २ लघु पाटबंधारे योजनेत पाणी टाकण्यासाठी अतिरिक्त पाण्याची तरतूद उपलब्ध नाही.

तथापि, नंदुरबार शहरापासून १० कि.मी. दूर असलेल्या शिवण मध्यम प्रकल्पाचे जलाशयात नंदुरबार शहराची भविष्यकालीन लोकसंख्या वाढ गृहीत धरुन ४.६० द.ल.घ.मी. पाण्याचे आरक्षण करण्यात आले आहे.

-----------------

**ग्रामीण रुग्णालय (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे रुग्णांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(७२) * ७००० श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथील ग्रामीण रुग्णालयात मागील तीन महिन्यांपासून औषधांचा तुटवडा जाणवत असतांनाही संबंधित वैद्यकीय अधिकारी याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामीण रुग्णालयात असुविधा, वैद्यकीय अधिका-यांसह कर्मचा-यांची अनुपस्थिती व औषधांचा तुटवडा असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही. मार्च, एप्रिल व मे, २०१५ दरम्यान सदर रुग्णालयात आवश्यक औषधसाठा असल्याची खात्री करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील धरणे व तलावातील गाळ काढणेबाबत**

**(७३) * ६६९७ श्री.जयंत पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४०२० ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विविध धरणांतील गेल्या अनेक वर्षापासून साचलेला गाळ विनामुल्य काढण्यासाठी एका जर्मन कंपनीने राज्य शासनाकडे तयारी दर्शवून तसा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केला आहे, हे खरे आहे,

(२) राज्यातील धरणातील गाळ काढणे खर्चिक व जिकीरीचे असल्याने, गेल्या अनेक वर्षापासून राज्यातील बहुतेक धरणांतील गाळ न काढल्यामुळे सर्वच धरणांत मोठया प्रमाण गाळ साचल्याने धरणांची सिंचन क्षमता अत्यंत कमी झाली आहे तसेच काही धरणांमध्ये गाळ काटोकाट भरल्याने, या धरणांत पाणी साचत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू जर्मन कंपनीने एक पैसाही न घेता धरणांतील गाळ उपसण्याबाबत राज्य शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे,

(४) तसेच धरण व तलाव यामधील गाळ न काढल्याने पाण्याची पातळी कमी होत असल्याचे महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन केंद्र नाशिक (मेरी) यांनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

मेरी, नाशिक यांनी ६१ धरणातील गाळाचे सर्वेक्षण केले आहे. सरासरी ३४ वर्षाच्या कालावधीत ६१ धरणातील पाणीसाठा ८.५ टक्केनी कमी झालेला आहे. गाळ साठल्यामुळे दरवर्षी सिंचन क्षमतेत सरासरी ०.२५ टक्के घट होत असल्याचे निदर्शनास येते. तथापि, धरणामध्ये गाळ काठोकाठ भरल्याने पाण्याचा साठा न होणारी धरणे नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) नाही.

धरण व तलावातील गाळ न काढल्याने पाण्याची पातळी कमी होत नाही. तथापि धरण व तलावातील पाणीसाठा कमी होती. मेरी, नाशिक यांनी ६१ धरणातील गाळाचे सर्वेक्षण केले असून सरासरी ३४ वर्षाच्या कालावधीत पाणीसाठा ८.५ टक्के कमी झाला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात गेल्या ५ ते ७ वर्षात ५० वाघांची शिकार झाल्याची बाब केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (CBI) तपासात निदर्शनास आल्याबाबत**

**(७४) * ७४२२ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक ४१९७ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या ५ ते ७ वर्षात ५० वाघांची शिकार झाल्याची बाब केंद्रीय अन्वेषण विभाग (CBI) च्या तपासात स्पष्ट झाल्याचे दिनांक ५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाघाची शिकार व त्यांच्या अवयवाची तस्करी करणारी टोळी विदर्भात मध्य प्रदेशातून आली असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तस्करांवर आळा घालण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना केली आहे व आतापर्यंत किती वाघ तस्करांवर कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) राज्यात वन्यप्राण्यांची होणारी अवैध शिकार टाळण्यासाठी शासन व एन.टी.सी.ए यांचे कडुन प्राप्त होणाऱ्या सुचना व मार्गदर्शन सुचनाचे अनुषंगाने वन्यप्राण्यांची अवैध शिकार होऊ नये व संरक्षणाच्या दृष्टीकोनातुन खालीलप्रमाणे उपाययोजना केलेल्या आहेत.

- सर्व व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वायरलेस यंत्रणा कार्यान्वित आहे.
- जंगलात आवश्यक त्या ठिकाणी संरक्षण मनोरे उभारलेले असून, वनकर्मचारी त्या ठिकाणी मुक्काम करुन निगराणी करतात.
- संपूर्ण संरक्षित क्षेत्रात संरक्षण कुट्यांची उभारणी केली असून, या ठिकाणी २४ तास वनकर्मचारी तैनात असतात.
- पेंच व ताडोबा व्याघ्र प्रकल्पात Special Tiger Protection Force (STPF) तैनात केली आहे. तसेच नवेगाव-नागझिरा व मेळघाट व्याघ्र प्रकल्पात STPF तैनात करण्यासाठी शासनाने नुकतीच मान्यता प्रदान केलेली आहे.
- वनकर्मचाऱ्यांकडून संरक्षित क्षेत्रात नियमितपणे पायी गस्त घालण्यांत येते तसेच वाहनाद्वारे गस्त घालण्यांत येते याचबरोबर पावसाळयात आवश्यक त्या ठिकाणी माजी सैनिकांद्वारे गस्त करण्यांत येते. वनकर्मचाऱ्यांना पिस्तूल, रायफल सारख्या शस्त्रांचा पुरवठा केलेला आहे. तसेच एखाद्या घटनेचा जलद गतीने पाठपूरावा करण्यासाठी वाहनाची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

- शिकाऱ्याबाबत गोपनियरित्या माहिती संकलित करण्यांत येते. खबऱ्याला बक्षिस देण्यासाठी गुप्त सेवा निधीची तरतूद केलेली आहे.
- गस्ती, गुप्त माहिती प्राप्त करणे याकरिता अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी यांचा सहभाग घेतला जातो.
- वनक्षेत्रामध्ये पाणस्थळांची व पाणस्थळाकडे येणाऱ्या वन्यप्राण्यांच्या पायवाटांची नियमीतपणे तपासणी करण्यात येते व वरिष्ठ अधिकाऱ्यांद्वारे नियमीतपणे संनियंत्रण करण्यात येते.
- आवश्यक त्या ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आले असून त्याद्वारे वाहनांची नेहमी तपासणी करण्यात येते.
- अवैध शिकारीकरीता बाहेरील काही अनोळखी व्यक्ती इत्यादी आले किंवा कसे याची शहानिशा करण्याकरीता संरक्षित क्षेत्रालगतचे गावांमध्ये नियमीत भेटी देवून पोलीस पाटील/सरपंच इत्यादींची भेट घेऊन माहिती प्राप्त करण्यात येते.
- वनसंरक्षणात लोकांचा सहभाग वाढावा म्हणून ग्रामपरिसर विकास समित्या स्थापन करण्यांत आल्या आहेत.
- चंद्रपूर व नागपूर येथे Sniffer Dog ठेवण्यात आला असून त्यांचेद्वारे नियमीतपणे रेल्वे स्टेशन/बस स्टँड/आठवडी बाजार व संशयास्पद ठिकाणी वन्यप्राण्यांचे अवयवांचा अवैध व्यापार, वाहतुक याचा शोध घेण्यात येतो.वनक्षेत्रांमधील जाणाऱ्या विद्युत लाईनवर नियमीतपणे गस्त करण्यात येते. तसेच विद्युत विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेशी नियमीतपणे संपर्क ठेवला जातो व संबंधीत सबस्टेशनचे कार्यक्षेत्रात विद्युत करंट खंडीत झाल्यास त्याची माहिती घेवून विद्युत करंटद्वारे वन्यप्रांण्याच्या शिकारीचा प्रयत्न झाला किंवा कसे याची शहानिशा करण्यात येते.
- वन्यप्राणी विशेषत: वाघाचे हालचालीचा मागोवा घेण्याकरिता त्यांच्या जाण्यायेण्याच्या संभावीत रस्त्यावर, पाणस्थळाजवळ नियमीतपणे कॅमेराट्रॅप लावण्यात येतात.
- वन्यप्राणी स्वास्थ व जखमी वन्यप्राण्यांवर उपचाराकरीता नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील विविध शाखेतील तज्ञ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची चमूचे गठण करण्यात आले असून वेळोवेळी त्यांचे सहकार्य घेण्यात येते.

-----------------

## आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील डिंबे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याचे अस्तरीकरण करण्याचे व कालवा दुरुस्तीचे काम करण्याबाबत

**(७५) * ७९५७ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील डिंबे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यातून पाणी सोडल्यावर कालव्याच्या भरावातून मोठया प्रमाणात पाणी पाझरत असल्याने लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाव्या कालव्याचे सिमेंटचे अस्तरीकरण ठिकठिकाणी खचले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डाव्या व उजव्या कालव्याचे अस्तरीकरण करण्याचे व कालवा दुरुस्तीचे काम गेल्या १० वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: हे खरे आहे.

डिंभे धरणाचा डावा कालवा हा डोंगराच्या बाजूने कंटूर कालवा आहे. कालवाच्या एका बाजूस उंच डोंगर व दूसऱ्या बाजूस खोल दरी आहे. कालवाच्या काही भागातील तळ हा सच्छिद्र भूस्तरातून जातो. डिंभे कालव्यातून पाझर होत आहे. ही वस्तुस्थिती आहे.

डिंभे उजव्या कालव्यावरील कामे अद्याप अपूर्ण आहेत व अस्तरीकरण अशत: पूर्ण झाले आहे. त्यामुळे या कालव्यातून पाझर होती.

(२) डिंभे कालवा सतत चालू नसल्याने व खोल खोदाईच्या ठिकाणी कालव्याच्या कडा कोसळून अस्तरीकरणाचे नुकसान झाले आहे.

(३) होय.

डिंभे कालव्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत सादर करण्यात आला होता तथापि निधी व वेळेच्या मर्यादेमुळे मान्यता देण्यात आली नाही. सदरचा प्रस्ताव पुनश्च अद्यावत व सुधारीत करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

डिंभे उजव्या कालव्याची उर्वरित कामे, कुकडी प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) डिभे डाव्या कालव्याच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करण्यात येत असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेनुसार दुरुस्तीची काम करण्याचे प्रस्तावित आहे.

डिंभ प्रकल्प हा कुकडी प्रकल्पाचा भाग असून कुकडी प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर निधी उपलब्धतेनुसार कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रस्त्यावर लहान मुलांसह भिक मागणाऱ्या भिकाऱ्यांची डीएनए टेस्ट बंधनकारक करण्याबाबत**

**(७६) * ६७३९ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्त्यावर लहान मुलांसह भिक मागणाऱ्या भिकाऱ्यांची डीएनए टेस्ट बंधनकारक करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने एप्रिल-मे, २०१५ च्या दरम्यान मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याप्रकरणी केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कुपवाडा (जि.सांगली) येथील अंगणवाड्यांसाठी शालेय पोषण आहार पत्राच्या शेडमध्ये तयार होत असल्याबाबत**

**(७७) * ९२१७ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुपवाडा (जि.सांगली) येथील २३ अंगणवाड्यासाठी ७ बचतगटांना एकात्मिक बालविकास विभागाकडून शालेय पोषण आहाराचा ठेका दिलेला ठेकेदार कोल्हापूर रस्त्यावरील एका पत्र्याच्या शेडमध्ये शालेय पोषण आहार तयार करीत असताना अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी, महानगरपालिका अधिकारी व एकात्मिक बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान एकत्रित छापा टाकून अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी, महानगरपालिका अधिकारी व एकात्मिक बाल विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रितपणे छापा टाकला परंतू कोणालाही अटक केलेली नाही.

(२) याबाबत चौकशी करण्यात आली असून चौकशीत सात बचत गटांनी ठेका घेतेवेळी दर्शविलेल्या व स्वतंत्र स्वयंपाकगृहात सकस आहार शिजविणे आवश्यक होते. तसे न करता एकत्रित तयार केल्याचे आढळून आले. त्यामुळे ठेक्यामधील कराराचा भंग होत असल्याने या ७ बचत गटांचा सकस आहाराचा पुरवठा बंद करण्यात आला व त्यांच्या विरोधात सांगली शहर पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत पोलीस चौकशी करीत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे पिंपळनेर (ता.बीड) येथे राष्ट्रीयकृत बँकेची शाखा स्थापन करण्याबाबत**

**(७८) * ७४८६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या लक्षात घेवून जिल्ह्याच्या ग्रामीण भागात राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांची संख्या वाढविण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड व मा.अर्थ मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे पिंपळनेर (ता.बीड) येथे राष्ट्रीयकृत बँकेची शाखा स्थापनेची मागणी ग्रामस्थांनी दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात राष्ट्रीयकृत बँकांची संख्या वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक ३१.३.२०१५ च्या स्थितीनुसार बीड जिल्ह्यात सर्व बँकांच्या एकुण १४२ शाखा असून त्यापैकी ७४ शाखा ग्रामीण भागात आहेत. भाग -१ व भाग - २ मध्ये नमूद केलेली निवेदने जिल्हाधिकारी, बीड यांनी अग्रणी बँकेकडे व जिल्हा अग्रणी बँकेने दिनांक ६/६/२०१५ रोजी विभागीय व्यवस्थापक, भारतीय स्टेट बँक, जालना रोड, बीड यांच्या कार्यालयाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार तालुक्यातील वनविभागाने पाळशिंद या गावात लावलेल्या रोपांबाबत**

**(७९) * ७२१२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार तालुक्यातील वनविभागाने पाळशिंद या गावात १ लाख २६ हजार रुपयांचा खर्च करुन २० हजार रोपे खड्डे काढून लावल्याचे कागदोपत्री दाखविले आहे परंतू या ठिकाणी ५०० खड्डे आहेत व त्यातील जेमतेम खड्ड्यातील रोपे तग धरुन असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील उमा बॅरेजचे तसेच शहापूर ल.पा. प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(८०) * ७३८७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यात ५,५१० हेक्टर क्षेत्रावर सिंचन सुविधा निर्माण करणाऱ्या उमा बॅरेजचे तसेच शहापूर लपा प्रकल्पांचेही काम गत दीड वर्षापासून बंद अवस्थेत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमा बॅरेजचे बांधकाम नागपूर येथील एकाच कंत्राटदाराच्या दोन वेगळया नावाने असलेल्या आस्थापनांना देण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, सदर प्रकल्पाची कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) उमा बॅरेज प्रकल्पाच्या कामाच्या दोन निविदा असून एक निविदा संयुक्त भागीदारीत आहे व एक निविदा स्वतंत्र अभिकरणात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) १) उमा बॅरेजच्या दोन्ही निविदाधारकांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली असून, संबंधित निविदाधारकांनी जून, २०१५ पासून प्राथमिक कामास सुरुवात केलेली आहे.

२) शहापूर ल.पा. योजनेचे काम कंत्राटदाराने मुळ व वाढीव मुदतीत पूर्ण न केल्यामुळे सदर करारनामा कलम ३ (क) अन्वये रद्द करण्यात आलेला असून सदरचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. नव्याने निविदा निश्चितीकरीता सदर प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु केली आहे.

-----------------

## महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटनेचे आर्थिक व्यवहाराचे शासकीय यंत्रणेकडून वार्षिक लेखा परिक्षण होत नसल्याबाबत

**(८१) * ७२२७ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना डीएनई-१३६ या औरंगाबाद जिल्हा संघटनेच्या आर्थिक व्यवहाराचे शासकीय यंत्रणेकडून वार्षिक लेखा परिक्षण होत नाही, त्यामुळे संघटनेचे पदाधिकारी सभासदांना विचारात न घेता मनमानी पद्धतीने आर्थिक व्यवहार करीत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त संघटनेच्या आर्थिक व्यवहाराची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघ नोंदणी क्रमांक डीएनई १३६, या संघटनेची नोंदणी श्रमिक संघ अधिनियम १९२६ अंतर्गत अतिरिक्त निबंधक श्रमिक संघ मुंबई यांच्याकडून करण्यात आल्याचे दिसून येते. अशा स्वायत्त संघटनांवर उप आयुक्त कामगार यांचे नियंत्रण असल्याने प्रश्नाकिंत संघटनेच्या लेखा परिक्षणाबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, कामगार यांना कळविण्यात येत आहे.

-----------------

### नमिनाथजी जैन फाऊंडेशन अंतर्गत (बोरिवली) येथील रुग्णांना 'राजीव गांधी जीवनदायी' योजनेचा लाभ देण्याबाबत

**(८२) * ७१६४ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली (पू.) येथील मागाठणे व बोरिवली (प.) येथील साईबाबा नगर येथे नमिनाथजी जैन फाऊंडेशन तर्फे डायलिसीस केंद्र सुरू करण्यात आले. परंतु या संस्थेकडून गरीब रुग्णांना डावलले जात असून 'राजीव गांधी जीवनदायी' योजनेचा लाभ घेणा-या रुग्णांना सेवेचा लाभ ही संस्था देत नसल्याचे माहे २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) नाही.

नमिनाथजी जैन फाऊंडेशन तर्फे चालविण्यात येणारी मुंबईतील मागाठाणे, बोरिवली (पूर्व) या साईबाबा नगर, बोरिवली (पश्चिम) ही डायलेसीस केंद्रे दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ पासून राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत करण्यात आली आहेत. योजनेअंतर्गत आतापर्यंत सदर केंद्रांकरिता अनुक्रमे १६७७ व १७३५ प्रि.ऑथरायझेशन मंजूर करण्यात आले असून त्यापैकी १६७१ व १७३४ रुग्णांवर डायलेसीसचे उपचार करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील मंजूर तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८३) * ९९५३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयाच्या अखत्यारीतील मंजूर तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या ८१६ पदांपैकी तब्बल ३१२ पदे रिक्त असून जिल्ह्यातील सात ग्रामीण रुग्णालयामध्ये १८५ पैकी ६८ पदे रिक्त असल्याने नागरिकांना तात्पुरता उपचार घेऊन पुढील उपचाराकरीता गोव्याला जावे लागते तसेच रुग्णालयातील डायलेसिससह अन्य

महत्वाच्या यंत्रणा बंद पडल्याने अनेक रुग्ण उपचाराअभावी मृत्युमुखी पडत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील रुग्णालयाची सदरील पदे त्वरित भरण्यासाठी तसेच रुग्णालयातील डायलेसिस यंत्रणेसह इतर यंत्रणा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) सिंधुदूर्ग जिल्हा रुग्णालयाच्या अखत्यारीतील मंजूर तृतीय व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या ८१६ पदांपैकी ३१२ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे.

अपघातग्रस्त मेंदूला ईजा झालेले रुग्ण तसेच काही विशिष्ट आजारातील रुग्ण यांना पुढील उपचारार्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोवा येथे पाठविण्यात येते. परंतू तात्पुरता उपचार देऊन सर्वच रुग्णांना गोवा येथे पाठविले जाते अशी वस्तुस्थिती नाही. तसेच, रुग्ण उपचाराअभावी मृत्युमुखी पडत आहेत, हे खरे नाही.

(३) व (४) वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे. वर्ग ३ व ४ ची रिक्त पदे बिंदूनामावली प्रमाणित करण्याची कार्यवाही सुरु आहे ती पूर्ण होताच पदे भरण्याबाबतची कार्यवाही नियमानुसार करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच, किडनी डायलेसिस युनिट कार्यान्वीत झालेले आहे.

-----------------

**विधान भवन :** 
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.